रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ८३
www.ramprahar.com
शुक्रवार, १० ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पनवेलच्या तहसीलदारपदी मिनल भामरेंची नियुक्ती/३
भूमी अभिलेख कार्यालयाजवळ झाडेझुडपे; सापांचे दर्शन/७
कसोटी मालिकेत भारताने रचला इतिहास/८

## आरोग्य विभागाच्या एनएचएम कर्मचाऱ्यांना १५ टक्के मानधन वाढ!

**मुंबई :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना १५ टक्के इतकी भरघोस मानधन वाढ देण्यात येणार आहे. त्याबाबत शासन मान्यता देण्यात आली असून, राज्यभरातील पन्नास हजारावर कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून आनंद व्यक्त होत असून आरोग्यमंत्र्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. कर्मचाऱ्यांचा आरोग्य यंत्रणा राबवण्यामध्ये एनएचएम महत्त्वाचा वाटा असून त्यांच्या उर्वरित मागण्याबाबतही शासन सकारात्मक असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. या निर्णयामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढेल आरोग्य विभागाची यंत्रणा अधिक परिणामकारक होईल, असा विश्वास आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

# सर्वंकष प्रगतीसाठी भारत-ब्रिटन भागीदारी -पंतप्रधान नरेंद्र मोदी

## व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि ब्रिटन वेगवेगळ्या क्षेत्रात नैसर्गिक भागीदार आहेत. या संबंधांना लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य यासारख्या मूल्यांवरचा परस्पर सामायिक विश्वास आहे. सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या काळात, भारत आणि ब्रिटन दरम्यानची ही वाढती भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार ठरली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ झाले असून, व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी निर्माण झाल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.



ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. मुंबईतील राजभवन येथे गुरुवारी (दि.९) त्यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा झाली. या चर्चेनंतर नरेंद्र मोदी व कीर स्टार्मर यांनी संयुक्त निवेदन जारी केले. त्यावेळी पंतप्रधान मोदी बोलत होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, यावर्षी जुलै महिन्यात माझ्या ब्रिटन दौऱ्यादरम्यान ऐतिहासिक सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करारावर (CETA) सहमती दर्शविली. या करारामुळे व्यापार आणि रोजगार निर्मिती वाढेल आणि ग्राहक तसेच उद्योग क्षेत्र दोघांनाही लाभ मिळेल. दोन्ही देशांतील उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधींची शिखर परिषद, सीईओ मंच आणि जागतिक फिनटेक महोत्सव यांच्या माध्यमातून सहकार्याच्या नव्या शक्यता समोर आल्याचेही त्यांनी नमूद केले.

युकेमध्ये वास्तव्यास असलेले १८ लाख भारतीय हे दोन्ही देशांमधील मैत्रीचे जिवंत उदाहरण आहे. त्यांनी ब्रिटिश समाज आणि अर्थव्यवस्थेत दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असून दोन्ही देशांतील मैत्री आणि विकासाच्या पुलाला बळकटी दिली आहे, असेही पंतप्रधान मोदी यांनी या वेळी सांगितले.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते 'दिबां'चेच नाव मिळणार

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विश्वास



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल यात आमच्या मनात कोणतीही शंका नाही, असे प्रतिपादन सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष आणि रायगड जिल्ह्याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले आहे.

एका मुलाखतीदरम्यान बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी कृती समितीच्या बैठकीत सर्वांसमोर या विषयावर स्पष्ट भूमिका मांडली आहे. येत्या तीन महिन्यांच्या आत विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव लागलेले आपण पाहू. ते पुढे म्हणाले, आज जे विरोधक या दि.बा.च्या नावा संदर्भात शंका उपस्थित करत आहेत, त्यांनी पूर्वी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाबाबत काय भूमिका घेतली होती, हे सर्वांना ठाऊक आहे. त्यामुळे विरोधकांचा उथळपणा स्पष्ट दिसतो आणि उथळ पाण्याला नेहमी खळखळाट जास्त असतो.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वपक्षीय कृती समितीच्या बैठकीत दिलेल्या आश्वासनावर आम्हाला पूर्ण विश्वास असल्याचे सांगत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुन्हा एकदा ठामपणे सांगितले की, आपल्या देशातील मोदी सरकार आणि महाराष्ट्र राज्यातील फडणवीस सरकार आपल्या शब्दाचे पालन करणारे आहेत. निश्चितच विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव लागेल.

# रायगडातील १५ पंचायत समित्यांच्या सभापतीपदाच्या आरक्षणाची घोषणा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील १५ पंचायत समित्यांच्या साभापतीपदांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी गुरूवारी (दि. ९) सोडत काढण्यात आली. अलिबाग व महाड पंचायत समिती सभापतीपद नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) महिलांसाठी राखीव झाले आहे. म्हसळा पंचयात समितीचे सभापतीपद अनुसूचित जाती महिलांसाठी, श्रीवर्धन पंचयात समितीचे सभापतीपद अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव आहे.

रायगड जिल्ह्यातील १५ पंचायती समिती सभापतीपदांच्या आरक्षणाची सोडत काढण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन सभागृहात गुरूवारी आरक्षण सोडत विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा आयोजित करण्यात आली होती. सामन्या प्रशासन उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके यांनी त्यांना सहकार्य केले. कु. मयुरा महाडीक हीने आरक्षणाच्या चिठ्ठ्या उचलल्या. आठ पंचायात समित्यांचे सभापतीपद महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.



### असे आहे आरक्षण

अनुसूचित जाती : म्हसळा (महिला), अनुसूचित जमातीः तळा (खुला), श्रीवर्धन (महिला), नागरिकांचा मागास प्रवर्गः महाड (महिला), कर्जत (खुला), माणगाव(खुला), अलिबाग (महिला, सर्वसाधारण प्रवर्ग : पनवेल (महिला), खालापूर (खुला), उरण (खुला), पेण (महिला), मुरुड (खुला), रोहा (महिला), सुधागड (महिला), पोलादपूर (खुला). यात आठ पंचायात समित्यांचे सभापतीपद महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.

## निवडक

### मुख्यमंत्री फडणवीस आज महाराष्ट्र दौऱ्यावर

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शुक्रवार (दि.१०)पासून महाराष्ट्र दौऱ्यावर असणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपची तयारी सुरू झाली आहे. देवेंद्र फडणवीसांच्या पुढील तीन दिवसांत सहा विभागीय बैठका घेणार आहेत. तर १० ते १३ ऑक्टोबरदरम्यान फडणवीसांच्या विभागनिहाय बैठका होणार आहेत. नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर येथे फडणवीस यांच्या जिल्हानिहाय बैठका होणार आहेत.

### ई-बस प्रवाशांसाठी एसटीकडून पास योजना

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी महामंडळाने) प्रवाशांच्या सोयीसाठी आणि ई-बस सेवेला अधिक प्रतिसाद मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता राज्यातील ई-बस प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. **(सविस्तर २ वर..)**

# मुंबई मेट्रो ३ला भरभरून प्रतिसाद

## पहिल्याच दिवशी एक लाख जणांकडून प्रवास

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मेट्रो ३ला पहिल्याच दिवशी प्रवाशांनी भरभरून प्रतिसाद दिला असून जवळपास एक लाख प्रवाशांनी प्रवास केला आहे. त्यावेळी मेट्रोच्या सीएसएमटी आणि चर्चगेट या ठिकाणी प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

ही गर्दी इतकी होती की सगळ्या इमर्जन्सी गेटवरून एन्ट्री आणि एक्झिट करावी लागली. सकाळी ५.५५ वाजता सुरू झालेली मेट्रो ३ ही रात्री १०.३० पर्यंत सुरू राहणार आहे.

मुंबई मेट्रो ३ म्हणजे अ‍ॅक्वा लाईनची आरे जेव्हीएलआर ते कफ परेड अशी सेवा गुरुवारपासून सुरू झाली. या लाईनवर प्रवाशांनीदेखील उदंड प्रतिसाद दिला. गुरुवारी, पहिल्याच दिवशी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत ९७ हजार ८४६ प्रवाशांनी प्रवास केला. मेट्रो ३ ही पूर्णतः भूमिगत मेट्रो असून दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



### अंतिम टप्प्यातील सुरू झालेली स्टेशन

आचार्य अत्रे चौक, सायन्स म्युझियम, महालक्ष्मी, मुंबई सेंट्रल, ग्रँट रोड, गिरगांव, काळबादेवी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, हुतात्मा चौक, चर्चगेट, विधान भवन, कफ परेड

पहिला टप्पा आरे ते बीकेसी आधीच सुरू आहे. दुसरा टप्पा बीकेसी ते आचार्य अत्रे चौकदेखील सुरू आहे. तिसरा टप्पा म्हणजे आचार्य अत्रे ते कफ परेड याचे पंतप्रधान मोदींनी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी उद्घाटन केले.

# खालापूर पोलिसांनी केला ३,३८३ किलो गांजा जप्त

## दोन जणांच्या आवळल्या मुसक्या

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

३,३८३ किलो ग्रॅम वजनाचा आणि १२०००० रूपये किंमतीचा गांजा या मादक व नशाकारक अंमली पदार्थ अवैद्यपणे विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांच्या मुसक्या खालापूर पोलिसांनी आवळल्या, त्यामुळे या जगतातील लोकांचे धाबे दणाणले आहेत.



जुना मुंबई-पुणे रस्त्यावर घोडीवली फाटा येथे गांजा विक्री करण्यासाठी दोन व्यक्ती येणार असल्याची पक्की खबर खालापूर पोलीस व गुन्हे अन्वेषण शाखा यांना मिळाली असता, उप विभागीय पोलीस अधिकारी यांची लेखी परवानगी व दोन शासकीय पंच घेऊन खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, संदीप पाटील सहा.फौजदार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगड अलिबाग, हे आपले सहकारी यांना घेऊन बंद पेट्रोल पंपावर दबा धरून बसले असता, गोपनीय बातमी मिळाली पक्की असल्याने दोन इसम स्कूटीवर गांजा विक्री करणेसाठी आले असता दबा धरून बसले असताना त्यांना जागीच पकडले, त्यांच्याजवळ ३३८३ किलो ग्रॅम वजनाचा १२०००० रूपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे. तसेच आरोपीत यांनी वापरलेल्या २००००० रूपये किंमतीच्या दोन स्कूटी जप्त करण्यात आल्या आहेत. अटक केलेल्या आरोपींना १३ तारखे पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली असून आरोपी गांजा कोठून आणला? त्यांचे इतर साथीदार आहेत का? याचा तपास सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारचे नशा कारक, गुंगीकारक अंमली पदार्थ कोणी व्यक्ती/इसम बाळगत असतील तर त्यांची माहिती डायल ११२, रायगड दृष्टी व्हॉटसप अ‍ॅप, ७६२००३२९३१, जनसपर्क अधिकारी, रायगड अलिबाग, नियंत्रण कक्ष रायगड अलिबाग येथे तसेच खालापूर पोलीस ठाणे येथे कॉल करून किंवा समक्ष भेटून देण्यात यावी, असे आवाहन खालापूर पोलीस यांनी केले आहे. पुढील तपास पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. गुन्हा रजि. नंबर ३४०/२०२५, NDPS अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २० (ब) ळळ, २९ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

यापूर्वी खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी एक वेळ गांजा व एक वेळ गुटखा पकडला होता, त्यामुळे हे काळे धंदे करणारे यांचे धाबे दणाणले आहेत.

# आकाशात झेपावणारी विमाने पनवेलकरांचे नवे आकर्षण

**खारघर : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळाचे उदघाटन झाले आहे. कित्येक वर्ष नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळाचे बोर्ड पाहणाऱ्या पनवेलकरांचे शहराच्या वरून विमान उडण्याचे स्वप्न सत्यात उतरले आहे. मागील महिनाभरापासून विमातळावरून अनेक विमानांनी उड्डाण घेऊन सराव केला असल्याने आपल्या घराच्या वरून जाणारी विमाने पनवेलकर आपल्या कॅमेऱ्यात कैदय करीत आहेत.



विशेष म्हणजे बच्चे कंपनीला या विमानांना पाहून मनसोक्त आनंद होत असल्याने अनेक लहान मुले आपल्या टेरेसवरून, बाल्कनीतून विमान पाहत आहेत. घराच्या अगदी जवळून जाणारे उडती विमाने आपल्या मोबाईलच्या कॅमेऱ्यात कैद करून सोशल मीडियावर अपलोड करण्याचा नवा ट्रेंड आपणास पहावयास मिळत आहे. नवी मुंबई विमानळावरून वर्ष अखेरीस शेकडो विमाने झेप घेणार असल्याने पुढील काळात विमानांच्या घिरट्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहेत. नव्याने वसलेले करंजाडे नोडपनवेल शहर याठिकाणी रहिवाशांमध्ये एक वेगळाच आनंद पहावयास मिळत आहे. कळंबोली सर्कल ते टी पॉईंट या राष्ट्रीय महामार्ग या विमानतळा लगत असल्याने अनेक वाहन चालक कुतूहलापोटी या विमानांचे दृश्य टिपण्यासाठी थांबत आहेत.

मुंबई विमानतळाकडे जाणारी विमाने खारघर टेकडीच्या वरून मुंबईकडे झेपावतात. खारघरवासियांना त्याचे दुरून दर्शन होत असताना पनवेल शहरालगतच्या विमानाच्या घिरट्या सध्या येथील रहिवाशांना वेगळा आनंद देत आहेत. पुढील हा आनंद ध्वनी प्रदूषणामुळे येथील रहिवाशांची डोकेदुखी देखील ठरेल असेही काही रहिवाशांचे मत आहे.

# पाली देवद ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपच्या ज्योती केणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुकापूर-पाली देवद ग्रामपंचायतीच्या सरपंच ज्योती रवींद्र केणी यांची बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी ज्योती केणी यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सुकापूर-पालीदेव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची निवडणुक गुरुवारी (दि.९) झाली. या निवडणुकीत ज्योती केणी यांची बिनविरोध निवड झाली. त्यांची निवड जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी जल्लोष साजरा केला.

या वेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन ज्योती केणी यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे नेते संजय पाटील, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य आणि मान्यवर उपस्थित होते.

# विषारी सिरप मृत्यूप्रकरणी कंपनी संचालकाला अटक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीसन फार्मा कंपनीच्या कोल्ड्रिफ कफ सिरपच्या एका बॅचच्या निर्मिती प्रक्रियेत गंभीर गडबड झाली. सिरपमध्ये शरीराला अपायकारक घटक मिसळण्यात आले. हे औषध ज्या चिमुरड्यांना देण्यात आले त्यांची तब्येत बिघडल्याच्या तक्रारी येण्यास सुरुवात झाली. तब्येत खालावली आणि मध्य प्रदेशमधील २३ बालकांचा मृत्यू झाला.

### आतापर्यंत अनेक मुले दगावली





या प्रकरणाची सरकारी पातळीवर गंभीर दखल घेण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यात कोल्ड्रिफ कफ सिरपची विक्री थांबवण्याचे आदेश दिले आहेत. विषारी कफ सिरप प्रकरणी श्रीसन फार्माचे संचालक गोविंदन रंगनाथन यांना अटक करण्यात आली आहे.

रंगनाथन गोविंदन हे चेन्नई येथील घर आणि कांचीपुरम येथील कारखान्याला कुलुप लावून पत्नीसोबत फरार झाले होते. मध्य प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने दोन दिवस तामिळनाडूतील चेन्नईत ठिकठिकाणी धाडी टाकल्या. पोलिसांनी रंगनाथन गोविंदन यांच्यावर २० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. अखेर गोविंदन रंगनाथन यांना अटक करण्यात आली.

# ई-बस प्रवाशांसाठी एसटीकडून मासिक व त्रैमासिक पास योजना सुरू

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी महामंडळाने) प्रवाशांच्या सोयीसाठी आणि ई-बस सेवेला अधिक प्रतिसाद मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता राज्यातील ई-बस प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की या पास योजनांचा मुख्य उद्देश नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने दररोज एकाच मार्गावर प्रवास करणाऱ्या नियमित प्रवाशांना



ई-बस सेवेकडे आकर्षित करणे हा आहे. सध्या महामंडळाच्या ताफ्यात ई-बस प्रकल्पातील ४४८ बस आणि शिवाई प्रकल्पातील ५० ई-बसेस कार्यरत आहेत. भविष्यात या बसेसची संख्या आणखी वाढवण्याचा मानस आहे.

अनेक प्रवाशांकडून ई-बस सेवेत पास प्रणालीची मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर महामंडळाने प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा प्रवास देण्यासाठी ही योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

### पास योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये

**उपलब्धता : ९ मीटर ई-बस, १२ मीटर ई-बस आणि ई-शिवाई सेवेमध्ये हे पासेस उपलब्ध असतील. (ई-शिवनेरी बससेवा वगळून) मासिक पास:(३० दिवस): २० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ३० दिवसांसाठी पास दिला जाईल. त्रैमासिक पास: (९० दिवस): ६० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ९० दिवसांचा पास उपलब्ध होईल. सेवा वर्गातील लवचिकता : उच्च सेवा वर्गाचा पास (ई-बस) वापरून प्रवासी निमआराम किंवा साध्या बसमध्येही प्रवास करू शकतील. फरक भाडे नियम: निमआराम किंवा साध्या बसच्या पासधारकांना ई-बसने प्रवास करायचा असल्यास, दोन्ही सेवांतील भाड्यातील फरक १००% दराने भरून तिकीट घेऊन प्रवास करता येईल.**

महामंडळाच्या या निर्णयामुळे दैनंदिन प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि आरामदायी प्रवासासाठी ई-बसचा वापर वाढण्यास मदत होईल, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

# ऑक्टोबर ब्रेस्ट कॅन्सर जागरूकता महिना म्हणून होणार साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड मेडिकल असोसिएशनतर्फे ऑक्टोबर महिना ब्रेस्ट कॅन्सर जागरूकता महिना म्हणून साजरा करण्यात येत आहे त्या निमीत्त झोनल वैद्यकीय अधिवेशन व मोफत तपासणी शिबिरांचे आयोजन श्रीवर्धन व खोपोली येथे करण्यात आले होते

या वेळी बोलताना रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी यांनी सांगितलं की श्रीवर्धन हे माझे पूर्वजांचे गाव असल्याने या उपक्रमाची सुरुवात आपल्या भागातून करावी असे मला वाटले. म्हसळा व श्रीवर्धनसारख्या ग्रामीण भागातील लोकांना फायदा व्हावा ह्या दृष्टीने हे शिबिर आयोजित करण्याचा निर्णय घेतला आणि मुंबई ऑँकोलॉजी सेंटरने यात मोठे सहकार्य केले त्याबद्दल आभार व्यक्त केले.

रायगड मेडिकल असोसिएशन तर्फे ऑक्टोबर – ब्रेस्ट कॅन्सर अवेअरनेस मंथ निमित्ताने सलग झोनल अधिवेशन कार्यक्रम व मोफत स्तन कर्करोग तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. हे पाचवे झोनल अधिवेशन दिनांक ४ ऑक्टोबर २०२५ रोजी हॉटेल मेरिटास सीविंड, श्रीवर्धन येथे रायगड मेडिकल असोसिएशन आणि श्रीवर्धन-म्हसळा तालुका आणि एमओसी पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले.

यावेळी डॉ. प्रशांत गांगल (सचिव) यांनी सर्वांचे आभार मानले. डॉ. कुमार ओसवाल (खजिनदार), डॉ. दिलीप सावळे, डॉ. आदित्य जंगम, डॉ. निलेश म्हात्रे व डॉ. संजीव पाटील यांवेळी उपस्थित होते. रायगडचे तालुका कार्यकारिणी सदस्य डॉ. अतुल गंद्रे, डॉ. हृषिकेश रूद्रवार, डॉ. दीपक ताक्के, व डॉ. किशोर कोकाटे यांच्या उत्कृष्ट आयोजनाचे विशेष कौतुक करण्यात आले. तसेच एम्ओसी टीम सुमंत जुलपे, शेखर गवडे व स्वप्निल बागल यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

७ ऑक्टोबर २०२५ रोजी कोंकण उन्नती मित्र मंडळ इंग्रजी माध्यम शाळा, श्रीवर्धन येथे एम्ओसी कॅन्सर केअर फाऊंडेशन, टाटा कॅपिटल आणि स्थानिक वैद्यकीय संघटनांच्या सहकार्याने मोफत स्तन कर्करोग तपासणी शिबिर घेण्यात आले. ह्या शिबिरात ३० लाभार्थ्यांनी सहभाग घेतला. या उपक्रमाचा पुढचा टप्पा म्हणून ६ वे झोनल वैद्यकीय अधिवेशन ८ ऑक्टोबर २०२५ रोजी हॉटेल कॅम्पोलियन क्लब, खोपोली येथे आयोजित करण्यात आले.

# 'ॲक्शन टेस्सा'च्या माध्यमातून फर्निचर उद्योगातील कारागिरांचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

ॲक्शन टेस्सा यांच्या माध्यमातून लाकूड फर्निचर उद्योगातील कारागिरांचा विशेष सन्मान करण्यात आला. इंजिनियअर्ड वूड पॅनल उत्पादनांची सर्वात मोठी उत्पादक आणि या क्षेत्रातील आघाडीची कंपनी ॲक्शन टेस्सा यांनी सलग दुसर्या वर्षी राष्ट्रीय सुतार दिन साजरा केला. या निमित्ताने कंपनीने फर्निचर उद्योगात काम करणार्या कारागिरांना एक वेगळी ओळख देण्यासाठी त्यांचा सन्मान केला.



या वर्षी कंपनीने राष्ट्रीय सुतार दिनानिमित्त देशभरातील ५० हून अधिक ठिकाणी मेगा मीट आयोजित केली होती. हजारो कारागिरांनी फर्निचर बनवण्याची त्यांची कला सामायिक केली आणि राष्ट्रीय सुतार दिन साजरा केला. चित्रपट अभिनेता अजय देवगण यांच्या प्रेरणादायी शब्दांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

त्यांनी कारागिरांच्या कामाला सलाम केला आणि त्यांच्या अदृश्य भूमिकेचे कौतुक केले, ज्यामुळे कारागिरांनाही प्रोत्साहन मिळाले. महत्त्वाचे म्हणजे, गेल्या वर्षीच्या यशावर आधारित, एमएसएमईच्या सहकार्याने विकसित केलेल्या तीन महिन्यांच्या अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर लगेचच प्रत्येक विद्यार्थ्याला नोकरीची ऑफर देण्यात आली, जी उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि कार्यक्रमाच्या मजबूत उद्योग प्रासंगिकतेची साक्ष आहे. ॲक्शन टेसा द्वारे प्रायोजित हा कार्यक्रम तरुण कारागिरांसाठी उज्ज्वल भविष्यासाठी एक लाँचपॅड बनला आहे. ॲक्शन टेसाचे व्यवस्थापकीय संचालक अजय अग्रवाल म्हणाले की, सुतार हे फर्निचर उद्योगाचा कणा आहेत कारण त्यांचे हात प्रत्येक स्वप्नाला आकार देतात. टेसा सलाम आणि डब्ल्यूपीपीटी सारख्या उपक्रमांसह, आम्ही आज त्यांचा सन्मान करत नाही तर उज्ज्वल भविष्याचा पाया देखील घालत आहोत.

# टपालाच्या लाल पेट्यांचा काळ संपला; अजूनही ग्रामीण आणि आदिवासी भागात पत्रव्यवहार सुरूच

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

समाजाच्या भावविश्वात गडद ठसा उमटवणारी लाल टपाल पेटी आता इतिहासजमा होत आहे. भारतीय डाक विभागाने १ सप्टेंबर २०२५ पासून या पारंपरिक पोस्ट बॉक्स हटवण्याचा निर्णय घेतला आहे. १८५४ साली सुरू झालेल्या आधुनिक टपाल सेवेपासून जवळपास दीडशे वर्षे हा लाल डबा केवळ पत्र टाकण्याचे साधन नव्हता, तर तो भावनांचा, नात्यांचा आणि संवादाचा जीवंत धागा होता.

शहरांच्या चौकांत, गावाच्या चौपाट्यांवर, शाळा-कॉलेजांच्या बाहेर, रेल्वे स्टेशनजवळ तो लाल डबा सर्वत्र दिसायचा. पत्र पाठविण्याची एक वेगळीच उत्सुकता असायची – कोणाचे उत्तर येईल, कोणाचा निरोप



मिळेल, याची आतुरता प्रत्येकाला असे. घराघरात पोस्टमनच्या शिट्टीचा आवाज म्हणजे आनंदाची चाहूल असायची. एका छोट्याशा डब्याने समाजात संवाद, नाती आणि भावविश्व जिवंत ठेवले होते. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, ई-मेल, सोशल मीडिया यांनी त्या पारंपरिक संवादपद्धतीला मागे टाकले आहे. त्यामुळे पत्रलेखन कमी होत गेले आणि अखेर लाल पेट्यांचा काळ संपला. पण अजूनही देशातील अनेक ग्रामीण व आदिवासी भागात पत्रव्यवहार हीच दळणवळणाची मुख्य कडी आहे. बँक व्यवहार, शासन योजना, पेन्शन, शाळांचे प्रवेशपत्र – या सर्व कागदपत्रांची पोहोच अजूनही डाकमार्गेच होते. अशा भागांतून टपाल पेट्या हटवणे म्हणजे त्या लोकांचा संवादतंतूच तोडण्यासारखे आहे.

पूर्वी पत्र येणे हा घरातला सण असायचा. परदेशातून आलेले पत्र, सैन्यातील जवानांचा संदेश, लेकराने आईला लिहिलेला निरोप – या सगळ्या ओळींमध्ये माणुसकीचा सुवास दडलेला असे. आजच्या पिढीसाठी ती पत्रं कदाचित केवळ संग्रहालयातील वस्तू असतील, पण जुन्या पिढीसाठी ती होती भावना जपणारी अमूल्य आठवण.

भारतीय डाक विभाग मात्र काळानुरूप बदलतो आहे. स्पीड पोस्ट, पार्सल सेवा, डाक बँक, आधार केंद्रे यामार्फत तो ग्रामीण भारताशी नवे संबंध निर्माण करत आहे.

लाल टपाल पेटी आता हटणार असली तरी तिच्या लोखंडी चौकटीत बंद झालेल्या लाखो भावना भारतीय मनात कायम जिवंत राहतील. ती फक्त पत्रांची पेटी नव्हती – ती होती आठवणींची शिदोरी, प्रेमाचा संदेशवाहक, लोकभावनेचा साक्षीदार आणि काळाशी जोडणारा भावनिक पूल.ती नाहीशी होईल, पण तिचा 'लाल रंग' भारतीय हृदयात सदैव ताजा राहील!

# खालापूर जि. प. आणि पं. स. गट आरक्षण सोडत १३ ऑक्टोबरला

**चौक:** प्रतिनिधी राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील आदेशान्वये रायगड जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या निर्वाचक गणाकरिता सदस्यांचे आरक्षण निश्चित करण्याकरिता तहसिलदार खालापूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वा. छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, पंचायत समिती कार्यालय खालापूर येथे विशेष सभा आयोजित करण्यात आलेली आहे.यावेळी सामाजिक,राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे तहसिलदार खालापूर अभय चव्हाण यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वाशी येथे विविध कामांचे उद्‌घाटन

**रोहे :** तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वाशी येथे एमआयडीसी कडून मंजूर झालेल्या अंतर्गत काँक्रिटीकरण या कामाचे उद्‌घाटन शुक्रवार, १० ऑक्टोबर रोजी खा. सुनील तटकरे, महिला व बालकल्याण मंत्री ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते होणार आहे

या कार्यक्रमास माजी आ.अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष मधुकर पाटील, प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव भगत, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, एमआयडीसी उपअभियंता शशीकांत गीते, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी उपसभापती रामचंद्र सपकाळ, अनिल भगत, शिवराम शिंदे, नंदकुमार म्हात्रे, विनीत कांदळगावकर, ज्ञानेश्वर साळुंखे, प्रितमताई पाटील, हेमंत कांबळे, दत्ता चव्हाण, सरपंच वंदना वारगुडे उपसरपंच अरविंद मगर आदी उपस्थित राहणार आहेत

# उद्योग संरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वीर मुरारबाजी देशपांडेशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था/शासकीय तांत्रिक विद्यालय केंद्र, महाड, जि.रायगड येथे राज्य शासनाच्या निर्देशानुसार अल्पमुदत अभ्यासक्रमांचे ऑनलाईन उद्घाटन सोहळा मोठ्या (दि.८ ऑक्टोबर रोजी) उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते ऑनलाईन पद्धतीने मुंबई येथे करण्यात आले. स्थानिक सोहळयाचे उद्घाटन प्रविण कृष्णा सुतार, विश्वकर्मा लाभार्थी, महाड यांचे शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास अध्यक्ष निवास प्रभाकर चव्हाण तसेच प्रमुख पाहूणे जयेश अशोक देशपांडे, उद्योजक महाड आणि अंजली सचिन सेळके (सि. मॅने. एचआर- सविता ऑईलटेक्नॉ. लिमि. महाड) तसेच आयएमसीसदस्य उपस्थित होते.

या अंतर्गत विविध रोजगारक्षम अल्पमुदत अभ्यासक्रम राबवले जाणार असून, प्रशिक्षणार्थींना क्षेत्रातील प्रशिक्षण मिळणार आहे.

# तळा नगरपंचायत पुरुष उमेदवारांना नगराध्यक्ष होण्याची संधी

**तळा : प्रतिनिधी**

तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण अखेर जाहीर झाले असून नगराध्यक्षपद हे आता ओबीसी राखीव (नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी) आहे. त्यामुळे अनेक इच्छुकांची संख्या वाढली असून उमेदवारी कोणाला मिळेल यासाठी तालुकावासीयांसह इच्छुकांनाही उत्सुकता आहे.

मुंबई येथे नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सोडत पद्धतीने काढण्यात आले. त्यामध्ये तळा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पद हे नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी (ओबीसी)





आरक्षित करण्यात आले आहे.

तळा नगरपंचायत झाल्यानंतर प्रथमच नगराध्यक्षपदासाठी ही थेट निवडणूक होत असून थेट नगराध्यक्ष पदाचा मान आता कोणत्या ओबीची पुरुष किवा महिलेला मिळणार आहे याची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

२०१६ मध्ये तळा ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमधे रूपांतर झाल्या नंतर. दहा वर्षांच्या कालखंडातमहिला आरक्षणामुळे एकाही पुरुषाला नगराध्यक्ष होण्याची संधी मिळालेली नाही आता येणारे आरक्षण हे ओबीसी आरक्षण असल्याने ओबीसी पुरुष नगराध्यक्ष होण्यास कोणतीही अडचण नसल्याने इच्छूक नगराध्यक्ष पदासाठी सध्या राष्ट्रवादीचे विद्यमान उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे व शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख राकेश वडके यांच्या नावाची चर्चा चालू आहे

ही निवडणूक २०२६-२०२७ या वर्षात होईल असे समजते त्यामुळे तळा नगरपंचायतीसाठीच्या नगराध्यक्ष पदाचे ओबीसी आरक्षण पडले असल्याने आतापासूनच इच्छूकांची संख्या वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये योगा सेशनचे आयोजन

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी विशेष योगा सेशनचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजीव अशोक साबळे यांनी भूषविले. मंडळ समिती तसेच कॉलेज व्यवस्थापन समिती आणि यजमान कॉलेज च्या प्राचार्या मेहरोश सनगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शन प्रो फिटनेस हेल्थ क्लब माणगावचे मालक मनोज उभारे यांनी केले.या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे आणि तणावमुक्त शिक्षणासाठी योगाचे महत्त्व पटवून देणे हा होता. मनोज उभारे यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले तसेच नियमित योगाभ्यासाचे फायदे सांगितले.

सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. योगासनांसोबतच श्वसनक्रिया व ध्यानाच्या माध्यमातून मानसिक एकाग्रता वाढवण्याचे तंत्र शिकविण्यात आले.कॉलेजच्या प्राचार्या मेहरोश सनगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले



# नागोठणे राजिप शाळेच्या विद्यार्थ्यांना अन्नदान

**नागोठणे : बातमीदार**

लायन्स सेवा सप्ताह अंतर्गत डिस्ट्रिक्ट ३२४ ए ४ इंटरनॅशनल लायन्स क्लबच्या माध्यमातून नागोठणे लायन्स क्लबच्या सौजन्याने १ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या दरम्यान विविध जनकल्याण उपक्रम राबविण्यात आले. लायन्स क्लबच्या सेवा सप्ताहच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी दि. ७ ऑक्टोबर रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा क्रमाक १ ( कचेरी शाळा) येथे राजिप कचेरी शाळा, राजिप कन्या शाळा, रजिप जोगेश्वरी नगर शाळेतील ८६ विध्यार्थ्यांना नागोठणे लायन्स क्लबचे चार्टड प्रेसिडेंट ला. प्रकाश जैन यांच्याकडून अन्नदान करण्यात आले. दरम्यान यावेळी भोजना मध्ये ला. सिद्धेश काळे यांच्याकडून गोड पदार्थ ( जिलेबी ) देण्यात आला.

राजिप कचेरी शाळे मध्ये लायन्स सेवा सप्ताह च्या शेवटच्या दिवशी मंगळवार दि. ७ ऑक्टोबर रोजी रजिपच्या विध्यार्थ्यांना नागोठणे येथील प्रसिद्ध कॅटरर्स दत्ता रजिवले यांच्या हाताने बनविलेले सुग्रास भोजन देण्यात आले. विध्यार्थ्यां समवेत मान्यवर व लायन्स क्लबचे पदाधिकारी व सदस्यांनी देखील भोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी संपन्न झालेल्या छोट्याशा स्वागत समारंभा प्रसंगी नागोठणचे पहिले लोकनियुक्त सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हरिशेठ काळे, ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया संजय काकडे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंके, नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, सचिव अनिल पवार, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक पिंटूशेठ जैन, व्यापारी निम्याशेठ मोदी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवा महिला नेत्या स्नेहल काळे, कचेरी शाळेच्या मुख्याध्यापिका समा शेळके, शिक्षिका ज्योती सैदाने, कन्या शाळेच्या शिक्षिका विजया धनावडे, जोगेश्वरी नगर शाळेच्या शिक्षिका कल्याणी चौवरे यांच्या समवेत लायन्स क्लबचे चार्टड प्रेसिडेंट ला.प्रकाश जैन, आदी उपस्थित होते.

**दुखवटा**

## चंदकांत जाधव



**धाटाव :** रोहे शहरात गेले ४० ते ४५ वर्ष केश कर्तनालयाच्या सेवेमध्ये असलेले रोहा तालुक्यातील मेढा गावचे रहिवासी नाभिक समाज बांधव चंदकांत द्वारकानाथ जाधव यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन गुरुवार, २/१०/ २०२५ रोजी झाले. त्यांचे मृत्युसमयी वय ६७ वर्ष होते. तर दशक्रिया शनिवार (दि. ११) मेढा येथील वाकेश्वर मंदीर तळ्याजवळ त्याचे उत्तर काय तर उत्तर कार्य द्वारकानाथ निवास रोहा नागोठणे रोड मेढा येथे होणार आहे.

## निवडक

### अल्पवयीन तरुणीचे अपहरण



**पनवेल :** तालुक्यातील वांगणी येथील स्वप्नालय मुलीचे बालगृह येथून एक अल्पवयीन तरुणीचे अपनयन करण्यात आले आहे. स्वप्नालय मुलीचे बालगृह येथून मुस्कान अरबाज शेख (वय १६) हिचे अपनयन करण्यात आले असून तिची उंची चार फुट सहा इंच, रंग निमगोरा, नाक लांब व सरळ, केस काळे, बांधा मजबुत असून अंगात पांढरा टिशर्ट त्यावर काळे पट्टे, उजव्या हातावर कोपरा जवळ लहानपणी लागल्याची खुण आहे. तिला भाषा हिंदी, मराठी अवगत आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका बेवारस पुरुष इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. अनोळखी बेवारस पुरूष इसम वय अंदाजे ४० ते ४७वर्षे, दोन्ही पाय सरळ, डोकयाचे केस काळे, डोळे व तोंड उघडे दिसत अहेत व दाढी मिशी नॉर्मल सफेद काळी वाढलेली, बांधा-सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट ४. इंच आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहा पोलीस निरीक्षक सुनील वाघ यांच्याशी संपर्क साधावा.

### १४ लाखांची घरफोडी

**पनवेल :** सेक्टर-१४ मधील डॉक्टरांच्या बंद घरात चोरट्यांनी हात साफ करत येथून तब्बल १४ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. कळंबोली पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. डॉ. गुरूनाथ नरशेट्टी (वय ६४) हे त्यांच्या बंगल्याला कुलूप लावून कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. ही संधी साधत अज्ञात चोरट्यांनी बंगल्याच्या लाकडी दरवाज्याचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातील लॉकर उघडून सोन्याच्या बांगड्या, मंगळसूत्र, लॉकेट, मोठे आणि लहान नेक्लेस, कानातील रिंग अशा दागिन्यांसह ४० हजार रुपयांची रोकड असा एकूण १४.७५ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. त्यावर त्यांनी याबाबतची माहिती कळंबोली पोलीस ठाण्याला दिली. त्यावर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घटनेची पाहणी करून अज्ञात विरोधात गुन्हा दाखल केला.

# उरण नगर परिषदेचे आरक्षण जाहीर

### २१ पैकी ११ जागा महिलांसाठी आरक्षित

**उरण : प्रतिनिधी**

सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागनिहाय अंतिम आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. या आरक्षणानुसार, नगरपरिषदेच्या एकूण २१ जागांपैकी ११ जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे निवडणुकीत महिलांचा सहभाग लक्षणीय असेल. २१ जागांवर विविध प्रवर्गासाठी आरक्षण लागू करण्यात आले आहे. नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी एकूण



६ जागा आरक्षित आहेत. यापैकी ३ जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी एकूण २ जागा आरक्षित आहेत.

यापैकी १ जागा अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव आहे. अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी कोणतीही जागा आरक्षित नाही (निरंक). सर्वसाधारण सर्वसाधारण प्रवर्गासाठी एकूण १३ जागा आरक्षित आहेत. यापैकी ८ जागा सर्वसाधारण महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या आरक्षणामुळे अनेक प्रभागांतील राजकीय समीकरणे बदलली असून, आगामी निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांना व उमेदवारांना त्यानुसार आपली रणनीती आखावी लागणार आहे.

### प्रभाग निहाय आरक्षण

**१) अ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला, ब सर्वसाधारण.२) अ अनुसूचित जाती - महिला, ब सर्वसाधारण. ३) अ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला, ब सर्वसाधारण. ४) अ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, ब सर्वसाधारण महिला. ५) अ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला, ब सर्वसाधारण. ६) अ अनुसूचित जाती, ब सर्वसाधारण महिला, ७) अ सर्व साधारण महिला, ब सर्वसाधारण. ८) अ सर्वसाधारण महिला, ब सर्वसाधारण. ९) अ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, ब सर्वसाध-ारण महिला १०) अ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, ब सर्वसाधारण असे आरक्षण पडले आहे.**

### चिंचपाडा येथे गाडीची चोरी

**पनवेल :** जवळील चिंचपाडा गाव येथे विठ्ठल मंदिराच्या बाजूला असलेल्या चार चाकी वाहनांच्या बॉडी शॉपच्या दुकानातून महिंद्रा कंपनीच्या पिकअप गाडीची चोरी झाल्याची घटना घडली आहे. अशोक कुमार शर्मा यांच्या दुकानात काम करण्यास आलेल्या दोन लाख रुपये किमतीच्या सफेद रंगाच्या महिंद्रा कंपनीचा पिकअप (एमएच ४६ एएफ ४६४८) याची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## गव्हाण विद्यालयात व्यवसाय मार्गदर्शन शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये सांगलीच्या एरला प्रोजेक्ट सोसायटीच्या वतीने आणि पाताळगंगा येथील इदेमित्सु ल्यूब इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या साहाय्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले.

विद्यालयामध्ये ८ व ९ ऑक्टोबर २०२५ असे दोन दिवसीय व्यवसाय मार्गदर्शन शिबिरामध्ये व्यवसाय मार्गदर्शक व समन्वयक मधुकर पवार यांनी विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या सुवर्णसंधी विषयीची उदाहरणांस माहिती दिली.

पी.पी.टी.च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यावसायिक समुपदेशन करण्यात आले. या वेळी या प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाल्याबद्दल विद्यार्थ्यांना 'एरला प्रोजेक्ट सोसायटी' व पातळगंगा येथील 'इदेमित्सु ल्यूब इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' यांचे वतीने प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर व दहावीचे वर्ग शिक्षक सर्वश्री प्रशांत परदेशी, सागर रंधवे, संदिप भोईर व ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले आदी उपस्थित होते.

प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील व समुपदेशक मधुकर पवार यांचे हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.





**पनवेल : भाजपच्या नवीन पनवेल मंडळ सदस्या ज्योती देशमाने यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत आणि अक्षय सिंग उपस्थित होते.**

## पनवेलच्या तहसीलदारपदी मिनल भामरे यांची नियुक्ती

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या तहसीलदारपदी मिनल भामरे यांची नियुक्ती करण्याचे आदेश राज्य सरकारच्या महसूल खात्याने काढले आहेत. त्यानुसार त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे.

पनवेल परिसरात असलेल्या मॅरेथॉन बिल्डरला दिल्या गेलेल्या अकृषिक जमिन दाखल्याप्रकरणाचा ठपका ठेवत तत्कालीन तहसीलदार विजय पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई केली गेली आहे. त्यांना या काळात जिल्हाधिकारी कार्यालयात सेवेत रुजू करून घेत त्यांचा पदभार अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांच्याकडे सोपविण्यात आला होता.

दरम्यान दरम्यान, शासना तर्फे मिनल भामरे



यांच्या नियुक्तीचे आदेश काढण्यात आले. त्यांनी नुकताच आपला पदभार स्वीकारला असून त्यांचे प्रांतधिकारी पवन चांडक यांनी पुष्पगुच्छ अभिनंदन केले.

# पूरग्रस्त भागांमध्ये गोसेवा

**नवेल : रामप्रहर वृत्त**

अ. भा. दिगंबर जैन श्रमण सेवासंघ तर्फे पंधरा टन चारा वितरण अखिल भारतवर्षीय दिगंबर जैन श्रमण सेवासंघ, मुंबईचे अध्यक्ष सुजित राजकुमार खोलापुरे, पनवेल यांच्या प्रेरणेतुन व नेतृत्वात अलीकडील दिगंबर जैन सिद्धक्षेत्र कुंथलगिरी जवळपासच्या पूरग्रस्त भागांमध्ये मोठ्या प्रमाणात गोसेवा करण्यात आली आहे. स्व-पर कल्याण समूह, बँगलोर परिवार यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम राबविण्यात आला.

पूरामुळे निर्माण झालेल्या गंभीर चारा संकटाच्या पार्श्वभूमीवर श्रमण सेवासंघ व स्व पर कल्याण समूहाच्या सेवाभावी कार्यकर्त्यांनी कपिलापुरी, रिधोरे आणि आवार पिंपरी या परिसरात चारा वितरण करून अनेक गोधनांना जीवनदायी आधार दिला. कपिलापुरी येथील जवळपास २५० पशुधनसाठी आठ टन, तर आवरपिंपरी येथील जवळपास ६०



पशुंसाठी तीन टन चारा वितरण करण्यात आलेत. त्याचप्रमाणे रिथोरे या गावामध्येपण चार टन चारा उपलब्ध करून देण्यात आला. ह्या कार्यासाठी वडणेरच्या विद्याप्रणम्य गौशाळेच्या पदाधिकारीचे सहकार्य लाभले. अश्यापद्धतीने जवळपास एक लाख पंधरा हजार रुपयांचे पंधरा टन चारा वितरण) सामाजिक कार्य केले गेले. या कार्यासाठी कारंजा, अमरावती, पुणे, नागपुर, जिंतूर, मुंबई तसेच पनवेल मधील श्रमण सेवासंघचे अनेक कार्यकर्ते यांनी पुढे येऊन आर्थिक सहयोग व सहकार्य केलेत, अशी माहिती संयोजक सुजित खोलापुरे यांनी दिली.

निर्यापक श्रमण वीरसागर जी महाराज यांच्या मार्गदर्शन व आशीर्वादाने पूरग्रस्त गावातील विद्यार्थी यांच्या साठी शैक्षणिक कीट व छात्रवृत्ती देण्याचा प्रयत्न येत्या पुढिल पंधरा ते वीस दिवसांमध्ये करण्यात येईल, अशी माहिती संयोजक सुजित खोलापुरे यांनी दिली.

## पनवेल पंचायत समितीची प्रारूप मतदार यादी जाहीर

**पनवेल : वार्ताहर**

सार्वत्रिक निवडणूक २०२५ अन्वये पंचायत समिती पनवेलची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. ही प्रारूप मतदार यादी तहसीलदार कार्यालय पनवेल, अपर



तहसीलदार - कार्यालय, पनवेल तसेच गटविकास अधिकारी कार्यालय पंचायत समिती पनवेल येथे पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना अवलोकनार्थ ठेवण्यात आली आहे.

या प्रारूप मतदार यादीवर हरकत असल्यास तशी लेखी हरकत व सूचना १४ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत तहसील कार्यालय पनवेल, अपर तहसील कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयात सादर करावेत. १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजेनंतर कोणत्याही लेखी हरकती आणि सूचना कार्यालयात स्वीकारल्या जाणार नाहीत याची पनवेल पंचायत समिती हद्दीतील सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन प्रभारी तहसीलदार पनवेल जितेंद्र इंगळे-पाटील यांनी केले आहे.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये रस्ता सुरक्षा जागरूकता उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये बुधवारी (दि.८) होंडा कार्स आणि बाईक्स यांच्यामार्फत स्कूलमधील प्राथमिक ते माध्यमिक वर्गासाठी रस्ता सुरक्षा जागरूकता उपक्रम राबविण्यात आला.



यामध्ये विद्यार्थ्यांना व्हिडिओ प्रेझेंटेशन व प्रात्यक्षिकाद्वारे रस्त्यावर चालताना अपघात होऊ नये यासाठी काय करावे दुचाकी वाहन व सायकल चालवताना वाहतुकीचे नियम जागरूकता, सतर्कता कशी पाळावी तसेच चारचाकी वाहन चालवताना पाळावे लागणारे वाहतुकीची नियमावली विद्यार्थ्यांना समजावण्यात आली. रस्त्यावरील पांढऱ्या व पिवळ्या पट्ट्या यांचे अर्थ रस्त्यावरील गोलाकार व त्रिकोणी साईन बोर्ड त्यावर असणारे चिन्ह याबद्दल संपूर्ण माहिती देण्यात आली.

रस्ते अपघात का व कसे होतात आणि ते कसे टाळायचे यावरचे उपाय विद्यार्थ्यांना समजावून भविष्यामध्ये ते जेव्हा वाहन चालवतील तेव्हा या सर्व बाबी त्यांनी लक्षात ठेवाव्या या भावना व्यक्त करून उपक्रमाची सांगता झाली.

# बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयातील बी.ए. एलएल.बी. प्रथम वर्ष व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी किशनचंद चेलाराम लॉ कॉलेज, मुंबई यांच्या वतीने आयोजित केलेल्या KCLC LexConcilio 2025 - लेट डी. एम. हरिश मॉडेल इंडियन पार्लमेंटरी डिबेट (राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा)मध्ये उत्साहाने सहभाग नोंदविला.

या प्रतिष्ठित स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत सर्वोत्कृष्ट संघ उपविजेता (Best Team Runner-Up) हा मानाचा किताब पटकावला. या यशातून विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रम, तयारी आणि उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्याचे दर्शन घडते.

ही सहभागिता प्राचार्य डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वादविवाद समिती प्रमुख सहाय्यक प्राध्यापक ऐश्वर्या पाटोळे यांच्या सहकार्याने पार पडली. या



कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना भारतीय संसदेच्या कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव मिळविण्याची, आपली वादविवाद कौशल्ये विकसित करण्याची आणि राष्ट्रासमोरील महत्त्वाच्या प्रश्नांवर सुसंरचित संसदीय चर्चेद्वारे विचार मांडण्याची एक अनमोल संधी दिली.

या मॉडेल संसद अधिवेशनात सहभागी विद्यार्थ्यांनी विविध राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवर विचारप्रवर्तक चर्चा आणि वादविवाद केले. चर्चेसाठी सादर करण्यात आलेले दोन महत्त्वाचे विधेयक पुढीलप्रमाणे होते. १.नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम-२०२५ 'Witch-Branding and Witch-Hunting and Other Harmful Practices (Prevention and Prohibition) Bill

2. The National Anti-Doping (Amendment) Bill, 2025 या कार्यक्रमाची प्रतिष्ठा अधिक वाढविणारा विशेष क्षण म्हणजे संसदेच्या एका अधिवेशनाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र शासनाचे कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते मंगल प्रभात लोढा यांनी भूषविले. त्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना वास्तवातील विधिमंडळीन कार्यप्रणालीचे अनुभव मिळाले आणि त्यांचे मार्गदर्शन प्रेरणादायी ठरले.

हे यश भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयासाठी अभिमानाचा क्षण ठरले असून, संस्थेच्या शैक्षणिक उत्कृष्टता आणि सर्वांगीण विद्यार्थी विकासाच्या बांधिलकीस अधोरेखित करते.

सोहेल, सानिया, स्नेहल, अब्दुल, पायल, स्वरूप, सुयश, आर्या कदम, नयन, खुशी, आकांक्षा, काव्या, वैदेही, यश कदम, श्रुती, नूपुर, उर्मी हे महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणारे विद्यार्थी होते.

# एआयकेटीसी स्कूल ऑफ फार्मसीत जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन-इ-इस्लाम्स काळसेकर टेक्निकल कॅम्पस, स्कूल ऑफ फार्मसीत थिंक हेल्थ, थिंक फार्मासिस्ट या घोषवाक्याखाली जागतिक फार्मासिस्ट दिन २४ ते २६ सप्टेंबरदरम्यान मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तीन दिवसीय कार्यक्रमामध्ये शैक्षणिक सत्रे, आरोग्य शिबिरे, विद्यार्थी स्पर्धा आणि सामाजिक उपक्रमांचा समावेश होता.

उद्घाटन कार्यक्रमाला डॉ. प्रकाश नारायण खंडेलवाल (कार्यवाह डीन, एमजीएम मेडिकल कॉलेज, नवी मुंबई) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासह डॉ. समीर सहस्रबुध्दे (संस्थापक व संचालक, सहस्रबुध्दे हॉस्पिटल व आयसीसीयू) आणि डॉ. सुप्रिया सहस्रबुध्दे (सल्लागार फिजिशियन व प्रशासक), डॉ.दीपांजना दास (प्राध्यापक, फार्माकोलॉजी एमजीएम मेडिकल कॉलेज) मान्यवर पाहुणे म्हणून सहभागी झाले. या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना फार्मासिस्टच्या आरोग्य सेवेतल्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. रमजान खाटीक (संचालक, एआयकेटीसी) आणि डॉ. शारिक सय्यद (डीन, स्कूल ऑफ फार्मसी) यांनी सर्व पाहुण्यांचे



स्वागत केले.

आरोग्य उपक्रमांतर्गत रक्तदान शिबिर, औषधी वनस्पती लागवड, मधुमेह व ॲनिमिया तपासणी शिबिर, महिलांचे आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी, मानसिक आरोग्य शिबिर व पोषण जनजागृती कार्यक्रम, एनएसएस शिबिर, त्वचारोग शिबिर, ओरिगामी स्पर्धा, फार्मा ट्रेझर हंट स्पर्धा आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वादविवाद, फार्मा झायका, फार्माबझ, मॉडेल बनविणे, व्हिडिओ निर्मिती, लोगो डिझायनिंग व फिटनेस स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला.

२६ सप्टेंबर रोजी झालेल्या समारोप कार्यक्रमाला उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. जिद्न्यासा सुनील प्रसाद (आंतरराष्ट्रीय व्यवसाय विकास व्यवस्थापक, तव्वाब फार्मा), श्री. खुरशीद अब्दुल्ला सबुवाला (संचालक, अत्तारी ब्रदर्स कॉस्मेटिक्स अँड फ्रॅग्रन्सेस एलएलपी), मोहम्मद सबुवाला (भागीदार, अत्तारी ब्रदर्स कॉस्मेटिक्स अँड फ्रॅग्रन्सेस एलएलपी) आणि मोहम्मद कैफ इम्तियाज खान (रेग्युलेटरी अफेयर्स ऑफिसर, तव्वाब फार्मा). त्यांनी विद्यार्थ्यांना फार्मसी व संबंधित क्षेत्रातील विविध करिअर संधींबद्दल मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम प्रा. तबरेसखान (WPD समन्वयक), प्रा. रश्मिन (CoST समन्वयक), प्रा. अबुझर (संयुक्त CoST समन्वयक) व इतर प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. हा उपक्रम डॉ. झहीर आय. काझी (अध्यक्ष, अंजुमन-इ-इस्लाम; पद्म पुरस्कार प्राप्त २०२४), बुरहान हारिस (कार्यकारी अध्यक्ष, बोर्ड ऑफ इन्स्टिटट्यूट, नवी मुंबई), डॉ. रमजान खाटीक (कॅम्पस संचालक), डॉ. शारिक सय्यद (डीन, स्कूल ऑफ फार्मसी) आणि डॉ. शेख अबुसुफयान (प्रमुख, डी फार्मसी विभाग) यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला.

## संपादकीय

# रंगतदार निवडणूक

गेल्या अनेक महिन्यांपासून बिहारची विधानसभा निवडणूक चर्चेत आहे. निवडणुकांची घोषणा होण्याच्या आधीपासून राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) व महागठबंधन यांनी मोर्चेबांधणी केली, मात्र या निवडणुकीत कोणता घटक महत्त्वाचा ठरणार हे अद्यापही कोणताही राजकीय पंडित सांगू शकत नाही. एनडीएचे पारडे जड असल्याची चर्चा मात्र आहे.

**बिहारमध्ये ज्याला जातींचे समीकरण जमते तो पक्ष वा आघाडी विजयी होते असे म्हटले जाते. गेला बराच काळ एनडीएतील भारतीय जनता पक्ष व नितीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलाने ही बाजू भरभक्कमपणे सांभाळल्याने बिहारची सत्ता हातात ठेवण्यात ते यशस्वी झाले. यंदाच्या निवडणुकीतही त्यांचेच पारडे जड दिसते आहे. राजकीय डावपेच, जातीय समीकरणे व थेट लाभाच्या योजनांची घोषणा करून एनडीएने बिहारच्या निवडणूक प्रचारात बाजी मारली आहे. ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीसाठीचे मतदान होईल व बिहारच्या राजकीयदृष्ट्या अतिशय तरबेज मतदारांनी कुणाच्या बाजूने कौल दिला आहे हे १४ नोव्हेंबरला स्पष्ट होणार आहे. बिहारमधील यंदाच्या निवडणुकीची चर्चा कितीतरी महिने आधी सुरू झाली ती निवडणूक आयोगाने राबवलेल्या बिहारमधील मतदारयाद्यांच्या सखोल पडताळणीच्या मोहिमेमुळे. एसआयआरची ही मोहीम अगदी सर्वोच्च न्यायालयातही पोहचली. मतदारयाद्यांच्या बाबतीत आधारकार्ड हे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात यावे असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले असले तरी अंतिम निकाल अद्याप आलेला नाही. एसआयआर मोहीमेत बिहारमधील जवळपास ५० लाख मतदारांची नावे मतदारयादीतून वगळली गेली आहेत. बराच काळ निवडणुकीचे वातावरण याच मुद्याभोवती फिरत होते, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार यांनी बिहारमधील महिलांना प्रत्येकी दहा हजार रुपये देण्याची घोषणा केली आणि महिलांची पसंती एनडीएच्या बाजूने झाल्याचे दिसू लागले. बिहारच्या मतदारांमध्ये ४६ टक्के महिला आहेत. तूर्तास जवळपास एक कोटी महिलांनी या योजनेंतर्गत अर्ज केले आहेत. तसेच अनेक महिलांच्या खात्यावर रक्कम जमाही झाली आहे. यातून बिहारमध्येही लाडक्या बहिणी एनडीएला विजय मिळवून देतील असे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे अतिमागास, दलित आणि मुस्लिम मतांच्या जोरावर विजयाची स्वप्ने पाहणाऱ्या तेजस्वी यादव यांच्यासारख्या नेत्यांसमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. लालुप्रसाद यादव यांच्या काळातील जंगलराजच्या आठवणी मागे सारून बिहारची जनता खरोखरीच त्यांना मते देईल का हा मोठा प्रश्नही आहेच. त्यातच एकेकाळचे निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या निवडणुकीतील सहभागामुळे कोणाचे भले होईल याविषयी कोणालाच काही अंदाज बांधता येत नाहीए. अर्थात प्रशांत किशोर हा घटक महत्त्वाचा मानला जातो आहे तो निव्वळ त्यांच्या सभांना होणाऱ्या गर्दीकडे पाहून. परंतु गर्दीचा मतांशी संबंध नसतो हे आपल्याकडच्या निवडणुकांमध्ये असंख्य वेळा सिद्ध झाले आहे. पीके मते खाऊ शकतील का आणि ती कुणाची हे सारे निकाल आल्यानंतरच कळेल. या निवडणुकीत जुन्या पिढीतील नेतेमंडळी मागे पडून तरुण पिढीतील नेत्यांना मतदार अधिक पसंती देतील असाही सूर लावला जात आहे. पण त्यात कितपत तथ्य आहे हे निवडणुकीचे निकाल आल्यावरच स्पष्ट होईल. एका सर्वेक्षणात बिहारी जनतेने त्यांना एनडीएकडून चांगल्या प्रशासनाची आशा वाटत असल्याचे म्हटले आहे. हा विश्वास गेल्या काही वर्षांतील एनडीएच्या त्या राज्यातील कामगिरीतूनच जनतेला वाटतो आहे.**

# जिल्ह्यात बालविवाह का थांबत नाहीत?



रायगड हा वैचारिक चाळवळीचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात आनेक साजिक चळवळी झाल्या. आध्यात्मिक गुरू या जिल्ह्यात आहेत, परंतु काही वाईट सामाजिक रुढी अजनही सुरू आहेत. त्याकडे कुणी गांभिर्याने पहात नाहीत. त्यापैकी एक रूढ आहे ती बाल विवाहाची. आजही रायगड जिल्ह्यात बालविवाहा होत आहैत. कायदा करूनही हे विवाह थांबत नाहीत. गेल्या नऊ महिन्यात जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंधक कायद्या अंतर्गत तब्बल २१ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. दर वर्षात ३४८ अल्पवयीन मुलींवर मातृत्वाचा भार पडला आहे. बालविवाह रोखले पाहिजेत. त्यासाठी केवळ कादया असुन चालत नाही तर सामाजाची मानसिकता बादलावी लागेल.

बालविवाह रोखण्यासाठी कायदा करण्यात आला आहे. पुरोगामी महाराष्ट्रात बालविवाह थांबलेले नाहीत. रायगड जिल्हयात देखील बालविवाह अजूनही होत आहेत. कायद्यानुसार मुलींसाठी लग्नाचे वय १८ वर्ष तर मुलांचे वय २१ वर्ष असणे अपेक्षित आहे. असे असूनही १४ ते १८ वयोगटातील मुलींची लग्न अजूनही लाऊन दिली जात आहेत. त्यामुळे अल्पवयीन मुलींवर कमी वयात मातृत्वाचा भार पडतो. गेल्या दीड वर्षात रायगड जिल्ह्यात तब्बल ३४८ मुलींवर मातृत्वाचा भार पडला आहे. २०२४ मध्ये २३७ अल्पवयीन मुली माता झाल्या होत्या. २०२५ मध्ये पहिल्या सहा महिन्यात १११ अल्पवयीन मुली माता झाल्या आहेत. ही आकडेवारी केवळ जिल्हा सामान्य रुग्णालयातील आहे. त्यामुळे अल्पवयीन मुलींमधील लग्न आणि गर्भधारणेचे प्रमाण यापेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. रायगड जिल्ह्यात जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीतल बालविवाह प्रतिबंधक कायदा अंतर्गत २१ गुन्ह्यांची नोंद झाली. यात तळा ४, रोहा ३, कोलाड २, वडखळ २, पोयनाड २, पाली १, मांडवा १, म्हसळा १, रसायनी १, मुरुड १, अलिबाग १, नागोठणे १ आणि महाड पोलीस ठाण्यातील १ गुन्ह्यांचा समावेश आहे.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

बालविवाह रोखण्यसाठी कायदा करण्यात आला कायद्याची अंमबजावणी प्रभाविपणे केली जात नाही. महत्वाची बाब म्हणजे गेल्या वर्षी बाल विवाह प्रतिबंधक कायद्याच्या अमंलबजावणीत वैयक्तिक कायद्याच्या माध्यमातून अडथळे आणता येणार नाही. अल्पवयीन मुलांच्या अधिकारांचे संरक्षण प्राधान्य देणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने बालविवाह प्रतिबंधक कार्यत्याच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्वही जारी केली आहेत. पण तरीही बालविवाहांचे प्रमाण कमी झालेले नाही. बालविवाहाचे प्रमाण ग्रामिण भागात जास्त आहे. त्यातही आदिवासी समाजात बालविवाह जास्त केले जातात.

लहान वयात लग्न केल्यास त्याचे मुलींवर शारिरीक आणि मानसिक परिणाम होत असतात. जन्माला येणार्या बाळावर त्याचे दुष्परिणाम होऊ शकतात. त्यामुळे बालविवाह आणि अल्पवयीन मुलींची गर्भधारणा रोखण्यासाठी पाऊले उचलण्याची मागणी केली जात आहे. आदिवासी समाजातील निरक्षरता, गरिबी आणि स्थलांतरण ही बालविवाह समस्ये मागील मूळ कारण आहे. जिल्ह्यातील आदीवासी ऊस तोडणीसाठी, खाणकाम करण्यासाठी आणी वीट भट्ट्यांवर जातात. या स्थलांतरामुळे मुलांची आबाळ होते. त्यामुळे मुलींच्या सुरक्षीततेसाठी लहान वयात मुलांमुलींची लग्न लावली जातात.

ग्रामिण भागातील बालविवाह रोखण्याची जबाबदारी ग्रामसेवकांवर आणि महिला व बाल विकास प्रकल्प अधिकार्यांवर सोपविण्यात आली आहे. मात्र या अधिकार्यांकडून बालविवाह रोखण्यासाठी फारसे प्रयत्न होतांना दिसत नाहीत. त्यामुळे बालविवाहाचे प्रकार सुरूच आहेत. जिल्ह्यातील बाल विवाह रोखण्यासाठी ग्रामसेवकांना प्रशिक्षण देण्याचे काम महिला व बालविकास विभागाने हाती घेतले आहे. आत्तापर्यंत चार तालुक्यांमध्ये प्रशिक्षण देण्यात आले आहे. उर्वरीत तालुक्यात पावसाळ्यानंतर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याशिवाय सार्वजनिक ठिकाणी तसेच ग्रामपंचायत स्तरावर जनजागृती करण्यासाठी उपाययोजना केल्या जाणार आहेत अशी माहिती रायगड जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयातून देण्यात आली.

कमी वयात लग्न झाल्यामुळे मुलींना वैवाहिक जाबबदार्यांनी जाणीव नसते. कमीवयात मातृत्वची जबाबदारी आल्यामुळे मानसिक ताण येतो. बालविवाहामुळे मुलींच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे आनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे बालविवाह थांबलेच पाहिजेत. बालविवाह थांबवायचे असतील तर कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित करावी लागेल. जनजागृती करावी लागेले. केवळ शासनापातळीवर हे प्रयत्न करून त्याला फार यश येणार नाही. केवळ कायदा करून कुठलीही परंपरा बंद होत नाही. त्यासाठी त्या समाजाची मानसिकता बदलावी लागते. ही मानसिकता एका रात्रित बादलणार नाही. ही बदलाची प्रक्रिया संथगतीने होते असते. परंतु हा बदल होण्यासाठी प्रयत्नच करू नये असे नाही. शासकीयपातळीवर कायदे केल जातात. त्याची अंमलबाजवणी करण्याचा प्रयत्न केला जातो. त्याला सामाजातून साथ मिळत नाही. बालविवाह केवळ आदिवासी साजात होता असे नाही इतरही समाजात बालविवाह होतात. त्याचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे बालविवाह रोखण्यासाठी सर्व समाजातील सुशिक्षीत लोकांनी पुढाकर घ्यायला हवा.

बाल विवाहामुळे मुला-मुलींचे मानसिक व शारीरिक शोषण होत असते. बालविवाह करणे अत्यंत घृणास्पद असून शासनानेही बालविवाह प्रतिबंधासाठी कायदे केले असून त्यानुसार असे विवाह करण्यास पुढाकार घेणारे कायद्याने गुन्हेगार आहेत.

**बाल विवाह**

**रोखण्यासाठी उपाय**

कोणत्याही व्यक्तीने किंवा सामाजिक संस्थेने प्रथम सत्र फौजदारी न्यायालयात तक्रार केली किंवा न्यायालयास इतर प्रकारे संभवित बालविवाहाची माहिती मिळाली तर सदर न्यायालय त्या बालविवाहास मनाई करणारा आदेश जारी करू शकते. या आदेशाची पूर्तता करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यासाठी न्यायालयास बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्याप्रमाणे सर्व अधिकार असतात.

**असा आदेश देण्यापूर्वी न्यायालय सर्व पक्षांची बाजू ऐकून घेईल.**

तसेच एखाद्या विशिष्ट मुहूर्तावर सामूहिक बालविवाहाची प्रथा असेल तर असे सामूहिक बालविवाहास प्रतिबंध करण्यासाठी न्यायालय योग्य कार्यवाही करून मनाई हुकूम जारी करू शकते.

वरील प्रकारचे बालविवाह रोखण्यासाठी मनाई हुकमाचे जाणीवपूर्वक उल्लंघन करणाऱ्या पुरुषांना दोन वर्षापर्यंतच्या सक्त मजुरीची कैद व रुपये एक लाखापर्यंत दंड ही शिक्षा होऊ शकते. पण गुन्हेगार स्त्रियांना फक्त दंड होऊ शकतो.तसेच मनाई हुकमाचे उल्लंघन करून केलेले बालविवाह पूर्णपणे बेकायदेशीर ठरतात.

**या कायद्याअंतर्गत असलेले गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र आहेत.**

हा विवाह रोखण्यासाठी समस्त देशभर भारत सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाअंतर्गत चाईल्ड लाईन ही एक सेवाभावी अशासकीय संस्था कार्यरत आहे. ही संस्था अनाथ मुले, भिक्षेकरी, पिडीत, अन्यायग्रस्त, हरवलेली वा सापडलेली, बालकामगार, बालविवाह यास बळी पडलेल्या मुलांसाठी ही सेवाभावी संस्था सद्दैव कार्यरत आहे.




## बीएसएनएलकडून स्पॅम कॉल्स टाळण्यासाठी नवीन फीचर लाँच

एअरटेल, जिओ आणि व्होडाफोन-आयडिया कंपन्यांद्वारे रिचार्ज प्लॅनमध्ये वाढ केल्यानंतर अनेक ग्राहकांनी बीएसएनएलकडे आपला मोर्चा वळविला आहे. रिचार्ज प्लॅन महाग झाल्यानंतर अनेकांनी बीएसएनएलमध्ये मोबाईल नंबर पोर्ट केले आहेत. दरम्यान, कंपनी ग्राहकांसाठी सतत नवीन योजना आणत आहे व ग्राहकांना जुन्या किमतीत स्वस्त रिचार्ज प्लॅन देत आहे.




बीएसएनएल सतत ४जी नेटवर्कवर काम करीत आहे. स्वस्त रिचार्ज प्लॅन आणि ४जी नेटवर्कनंतर आता बीएसएनएलने आपल्या ग्राहकांसाठी एक नवीन सेवा सुरू केली आहे. सततच्या स्पॅम कॉल्सच्या समस्येमुळे ग्राहकांना होणारा त्रास लक्षात घेत कंपनीने ही नवीन सेवा सुरू केली आहे. ग्राहक कंपनीच्या सेल्फकेअर ॲपवर स्पॅम कॉल्स आणि स्पॅम मॅसेजबद्दल तक्रार नोंदवू शकतात.

स्पॅम कॉल्स टाळण्यासाठी बीएसएनएलने एक उत्तम मार्ग अवलंबला आहे. आता तुम्ही तुमच्या बीएसएनएल नंबरवर येणाऱ्या स्पॅम कॉल्स आणि मेसेजबद्दल लगेच तक्रार करू शकता. यासाठी तुम्हाला कंपनीचा सेल्फकेअर ॲप मदत करणार आहे. बीएसएनएल ग्राहक सेल्फकेअर ॲपच्या मदतीने स्पॅम कॉल्स आणि मेसेजबद्दल तक्रार नोंदवू शकतात.


दरम्यान, सध्या स्पॅम कॉल आणि मेसेजची समस्या प्रचंड वाढली आहे. याबाबत दूरसंचार विभागानेदेखील अनेकदा कठोर पावले उचलली आहेत. फेक कॉल्स, मेसेजला आळा घालण्यासाठी 'ट्राय'ने नवीन नियम लागू केले आहेत. आता ग्राहकांना येणारे फेक कॉल्स, मेसेज ऑपरेटर स्तरावरच ब्लॉक केले जातील. ट्रायने घोटाळेबाजांना जोरदार झटका दिला असून गेल्या काही दिवसांत १८ लाखांहून अधिक मोबाईल नंबर्स व ६८० एंटिटीज (संस्थांना) ब्लॉक केल्या आहेत.

सर्वप्रथम तुमच्या फोनवर BSNL सेल्फकेअर ॲप ओपन करा. आता तुम्हाला स्क्रीनच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात असलेल्या तीन डॉटच्या आयकॉनवर क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्हाला खाली स्क्रोल करावे लागेल आणि Complaint and Preference पर्याय निवडावा लागेल. नंतर उजवीकडे तीन-लाइन मेनू टॅप करा आणि रिपोर्ट करा. आता तुम्हाला New Complaintवर क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्हाला एसएमएस किंवा व्हॉईस कॉलमधील पर्याय निवडावा लागेल आणि नंतर संपूर्ण माहिती द्यावी लागेल.

# जागतिक मानसिक आरोग्य दिन

दरवर्षी १० ऑक्टोबर हा जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानसिक आरोग्यासंबंधित समस्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि मानसिक आरोग्य जपण्यासाठी जागतिक पातळीवर साजरा केला जातो. मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे, मानसिक आरोग्याबाबत लोकांना शिक्षित आणि जागरूक करणे आणि त्यासाठी आवश्यक धोरणांना समर्थन करणे हे हा दिवस साजरा करण्यामागचे उद्दिष्ट आहे.

जागतिक मानसिक आरोग्य दिन १० ऑक्टोबर १९९२ रोजी १५०हून अधिक देशांमध्ये सक्रिय असलेल्या जागतिक मानसिक आरोग्य संघटनेच्या प्रयत्नांमुळे १० ऑक्टोबर १९९२ रोजी सुरू झाला. वर्ल्ड फेडरेशन फॉर मेंटल हेल्थचे डेप्युटी सेक्रेटरी जनरल रिचर्ड हंटर यांनी १९९२मध्ये हा उपक्रम प्रस्तावित केला होता. विविध माध्यमांवर मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत जागरूकता निर्माण करणे, मानसिक आरोग्याच्या समस्या असणे म्हणजे कोणताही कलंक नाही हे पटवून देणे आणि मानसिक आरोग्य कसे जपावे याबाबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या दिवशी केले जाता. एखाद्या व्यक्तीला किंवा एखाद्या समाजाला, मानसिक आरोग्य आणि त्याचा लोकांच्या आयुष्यावर होणारा परिणाम



**निमित्त**


आणि मदतीसाठी उपलब्ध साधनांबाबत शिक्षित करणे हे यामागील ध्येय आहे

मानसिक आरोग्यासंबंधित अडचणी दूर करणे, मानसिक आरोग्याबाबत जागरूक आणि संवेदनशील समाज निर्माण करणे आणि मानसिक आरोग्याच्या समस्यांकडे आवश्यक लक्ष आणि महत्त्व दिले जावे हे जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे उद्दिष्ट आहे. आपण सामना करीत असलेल्या मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत जास्तीत जास्त संवाद साधणे हादेखील हा दिवस साजरा करण्याचा एक मार्ग आहे. मानसिक आरोग्याच्या अनेक समस्यांपैकी एक म्हणजे नैराश्य. नैराश्य हा एक मानसिक आरोग्याचा आजार आहे, ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीला सातत्याने दुःखी असल्याची भावना जाणवते. आपली कोणालाही गरज नाही असे वाटते, जगण्यासाठी किंवा कोणतेही काम करण्यासाठी उत्साह वाटत नाही आणि आनंद मिळेल अशा गोष्टी करण्यात रस नाही असे वाटते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला रोजच्या जीवनातील सामान्य गोष्टी करण्यासाठी अडथळा येऊ शकतो आणि विविध प्रकारची शारीरिक आणि मानसिक लक्षणे दिसू शकतात.

यापैकी काही लक्षणे जाणवत असल्यास नैराश्य असेल असे नाही हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. कारण प्रत्येकाच्या आयुष्यात चांगले-वाईट दिवस येत असतात, पण जर ही लक्षणे दोन आठवडे किंवा त्यापेक्षा जास्त काळ सातत्याने जाणवत असतील. तुमच्या दैनंदिन कार्यावर परिणाम होत असेल तर डॉक्टरांची मदत घेण्याचा सल्ला दिला जातो.

१९९४ च्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये हा दिवस विशिष्ट थीमशिवाय साजरा केला गेला. प्रामुख्याने सामान्य मानसिक आरोग्य समस्यांबद्दल लोकांना शिक्षित करण्यावर लक्ष केंद्रित केले. १९९४मध्ये जागतिक फेडरेशन फॉर मेंटल हेल्थचे तत्कालीन सरचिटणीस यूजीन ब्रॉडी यांच्या मार्गदर्शनाखाली हा दिवस थीम असलेल्या उत्सवात बदलला.तुम्ही ज्यांच्याजवळ आहात त्यांना हे कळू द्या की, तुम्ही त्यांच्या मानसिक आरोग्याला प्राधान्य देता. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### रिकाम्या पोटी चहा पिण्याचे दुष्परिणाम

भारतात दिवसाची सुरुवात चहाशिवाय अपूर्ण मानली जाते. सकाळी उठताच हातात चहाचा कप घेऊन राहणे अनेकांना आवडते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की सकाळी रिकाम्या पोटी चहा पिल्याने तुमच्या आरोग्यावर काय परिणाम होतो? त्यामुळे पोटातील आम्ल वाढते का? सकाळचा चहा तुमचा मूड ताजा करू शकतो, परंतु जर तो रिकाम्या पोटी प्यायला गेला तर तो हळूहळू तुमच्या पचनसंस्थेला हानी पोहोचवू शकतो. म्हणून, जर तुम्हाला चहाची आवड असेल तर तो योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने पिणे चांगले आहे जेणेकरून तुमच्या आरोग्यावर परिणाम न होता त्याचा आनंद घेता येईल.



**१. कोणत्या समस्या उद्भवू शकतात?**

जेव्हा तुम्ही झोपेतून उठता तेव्हा तुम्ही एक प्रकारे उपवास करत असता कारण तुमचे पोट रिकामे असते. यावेळी, पोटात असलेले जठरासंबंधी रस म्हणजेच आम्ल आधीच सक्रिय असते. जर तुम्ही यावेळी चहा (विशेषतः दुधाची चहा) प्यायली तर ते पोटाचे आम्लीय स्वरूप आणखी वाढवू शकते. यामुळे तुम्हाला ॲसिडिटी, छातीत जळजळ, गॅस आणि पोटफुगी यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

**२. समस्या उद्भवण्याची कारणे?**

चहामध्ये असलेले कॅफिन आणि टॅनिन देखील पचनक्रियेला बिघडू शकते. टॅनिन हे एक संयुग आहे जे पचनक्रिया मंदावते आणि भूक कमी करू शकते. म्हणून, रिकाम्या पोटी चहा पिल्याने पोटाच्या नैसर्गिक आवरणाला नुकसान होऊ शकते, ज्यामुळे नंतर पोटाच्या समस्या होण्याची शक्यता वाढते.

**३. लक्षणं**

सकाळी चहा पिल्यानंतर पोटात जडपणा जाणवणे. घशात आंबट ढेकर येणे किंवा जळजळ होणे. भूक न लागणे किंवा अन्नाचा तिटकारा येणे. दुपारपर्यंत पोटात गॅस होणे आणि फुगणे. जर ही लक्षणे वारंवार जाणवत असतील, तर ते तुमच्या सकाळच्या चहाची सवय तुमच्या पोटासाठी चांगली नसल्याचे लक्षण असू शकते.

**४. आम्लपित्त कसे टाळावे?**

चहा पिण्यापूर्वी भिजवलेले बदाम, केळी किंवा कोरडे टोस्ट असे काहीतरी हलके खा. कमी कॅफिन असलेले हर्बल टी किंवा ग्रीन टी सारखे पर्याय निवडा. सकाळी सर्वात आधी कोमट पाणी किंवा लिंबू पाणी पिल्याने पोट शांत होते.

# खासगी लेखा परिक्षक करिता इच्छूकांनी अर्ज करावेत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा पोलीस कल्याण निधी अंतर्गत घटक पोलीस कल्याण निधी रायगड व त्याअंतर्गत चालणारे उपक्रम (पोलीस कॅन्टीन, वेल्फेअर पेट्रोलपंप) यांची वार्षिक तपासणी करण्याच्या अनुषंगाने चार्टर्ड अकाऊंटंट (लेखा परिक्षक) यांची नेमणूक करावयाचे प्रयोजन असून जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून इच्छूक खासगी चार्टर्ड अकाऊंटंट (लेखा परिक्षक) यांचे अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छूक खाजगी चार्टर्ड अकाऊंटंट (लेखा परिक्षक) यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण शाखा, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्याकडे अर्ज करावेत, असे प्रमुख लिपिक, पत्रव्यवहार शाखा अति.कार्य.कार्यालय अधीक्षक दिपिका पाटील यांनी कळविले आहे.

---

## पनवेल महानगरपालिका
## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Central Government / State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/२१४/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील गार्डन भूखंड क्र.१९,सेक्टर-५ अ, समोरील, नवीन पनवेल (पु) येथील ना-दुरुस्त फुटपाथ दुरुस्त करणे.. | ११,६०,७३६/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.१०/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त मुख्यालय (I)**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ५१२/५२८/२०२५**
**दिनांक :- ०९/१०/२०२५**

---

## ग्रामपंचायत करंजाडे
## ता. पनवेल, जि. रायगड
### निविदा सूचना

दिनांक : ०९/१०/२०२५

ग्रामपंचायत करंजाडे मार्फत ग्रामनिधी अंतर्गत मौजे करंजाडे हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्रांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसीकरण निर्बिजीकरण करणे करिता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करिता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एनजीओ यांच्या कडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करिता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था/एनजीओ यांचे कडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रामपंचायत करंजाडे येथे दि. १६/१०/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.
उघडलेल्या निविदा स्वीकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा. सरपंच ग्रामपंचायत करंजाडे यांचा राहील

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत करंजाडे हद्दीतील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रती श्वान) | 3000 | दि. १६/१०/२०२५ | दि. १६/१०/२०२५ |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करिता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूर्ण कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची राहील.
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जबाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदार बंधनकारक राहील.
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची जबाबदारी राहील.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS द्वारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहील.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडून दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
८. स्थानिक संनियंत्रण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९. वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**(श्रीम. मनिषा बबनराव जायभाये)**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत करंजाडे**

**सही/-**
**(श्री. मंगेश तानाजी शेलार)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत करंजाडे**

---

## नमुना - १
## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत
## जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी महाड यांचे कार्यालय
ता. महाड, जि. रायगड
दिनांक :- ०९/१०/२०२५

क्रमांक/भूसंपादन/कात-५/निवाराशेड/ थे.ख./नोटीस/२०२५

निसर्ग व तौक्ते चक्रीवादळामध्ये महाड व पोलादपूर तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. महाड व पोलादपूर येथील बहुतांश भाग हा डोगराळ, दरडप्रवण व पुरप्रवण भाग आहे. मा. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५/११/२०२२ व्हिडीओ कॉन्फरन्स आयोजित करण्यांत आली होती. त्या अनुषंगाने सदर बैठकीमध्ये दिलेल्या सूचनानुसार कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पातंर्गत महाड उपविभागमध्ये खार बंधाचे नुतनीकरणाचे बहु उद्देशीय निवारा केंद्राचे, भूमीगत विद्युत वाहिनीचे व आपत्ती सौम्यीकरणकरीता प्रस्तावीत इतर आवश्यक कामांचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.

**आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी रायगड यांचे प्राधिकृत आदेश ता. महाड अनुक्रमे**

१) क्रमांक/भूसंपादन/टे-६/E-१०४८२९६/मौजे रूपवली/२०२३ दिनांक २६/१२/२०२३
२) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे सोनघर/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
३) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे माझेरी/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
४) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे कोंडीवते (मुळ गावठाण)/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
५) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे शिंगरकोंड (मोरेवाडी)/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
६) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे वरंध (बौध्दवाडी)/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
७) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे आंबिवली बुद्रुक /२०२४ दिनांक २६/०४/२०२४
८) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे रायगडवाडी (हिरकणीवाडी), ता. महाड/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
९) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे पुनाडे तर्फे नाते (पुनाडेवाडी)/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
१०) क्रमांक/भूसंपादन/टे-६/२३७३८२७/मौजे मोहोत/२०२४ दिनांक ०८/०८/२०२४
११) क्रमांक/भूसंपादन/टे-६/E-३९२६९९३/ मौजे वरंध (कुंभारकोंड - पोकळेवाडी)/२०२५ दिनांक २८/०७/२०२५
१२) क्रमांक/भूसंपादन/टे-६/२५६२४११/मौजे कुंबळे/२०२४ दिनांक २३/०८/२०२४
१३) क्रमांक/भूसंपादन/टे-६/२५६२४०६/मौजे आंबेशिवथर (आंबेनळी) / २०२४ दिनांक २३/०८/२०२४
१४) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे कातीवडी (भिवघर)/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
१५) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे विन्हेरे (रावतळी मानेधार) / २०२४ दिनांक २६/०४/२०२४

**मा. जिल्हाधिकारी रायगड यांचे प्राधिकृत आदेश ता. पोलादपूर अनुक्रमे**

१) क्रमांक/भूसंपादन/टे-६/१५९६००६/मौजे दाभीळ/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
२) क्रमांक/भूसंपादन/टे-६/१५९६००६/मौजे केवनाळे (नानेघोळ गावठाण, कदमवाडी, बाबरवाडी)/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
३) क्रमांक/भूसंपादन/टे-६/१५९६००६/मौजे किनेश्वर (पेढेवाडी, गावठाण,)/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
४) क्रमांक/भूसंपादन/टे-६/१५९६००६/मौजे किनेश्वर (शिववाडी, पेठवाडी, किनेश्वरवाडी)/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
५) क्रमांक/भूसंपादन/टे-६/१५९६००६/मौजे कामथे फौजदारवाडी/२०२४ दिनांक २६/०४/२०२४
६) क्रमांक/भूसंपादन/टे-६/१५९६००६/मौजे कातळी (कामतवाडी) / २०२४ दिनांक २६/०४/२०२४
७) क्रमांक/भूसंपादन/टे-६/१५९६००६/मौजे हळदुळे/२०२४ दिनांक /०४/२०२४
८) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे मोरसडे (आडाचाकोंड)/२०२५ दिनांक २८/०७/२०२५
९) क्रमांक/भूसंपादन/टे-६/मौजे कुडपण बु./२०२५ दिनांक २८/०७/२०२५
१०) क्रमांक/भूसंपादन/टे-६/१५९६००६/मौजे साखर पेढेवाडी, चव्हाणवाडी/२०२४ दिनांक २६/०४/२०२४

अन्वये उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ आणि तनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसुल व वन विभाग क्र. एलक्यूएन ०१/२०१७/प्र.क्र. १२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी. पोपट ओमासे, उपविभागीय अधिकारी महाड याव्दारे,

१) खालील अनुसूची एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने तहसिलदार महाड व तहसिलदार पोलादपूर यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

२) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयुल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

३) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीव्दारे जिल्हा तहसिलदार महाड व तहसिलदार पोलादपूर यांचे नांवे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय निश्चित केलेला मोबदला संपुर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

४) संबंधित भूधारकांची ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) तहसिलदार महाड व तहसिलदार पोलादपूर यांचेकडे दाखल करावीत.

५) संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना तहसिलदार महाड व तहसिलदार पोलादपूर यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच सदर नमुना संपादन संस्थेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधाकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

६) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी महाड व तहसिलदार महाड व तहसिलदार पोलादपूर यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हिसंबंधित व्यक्तिना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

### अनुसूची - १
### तालुका महाड. जिल्हा रायगड

| अ.क्र. | दरडग्रस्त गावाचे नाव | स.नं. | एकूण क्षेत्र | निवारा शेडसाठी आवश्यक क्षेत्र (गूंठे) |
|---|---|---|---|---|
| १ | रूपवली- बौध्दवाडी, सुंभकोंड | १४९/३४ | ०.३९.०० | ०.०५.०० |
| २ | जूई बु. सोनघर | १९/६अ | ०.१९.३० | ०.०५.०० |
| ३ | माझेरी | ५३६ | १.०२.०० | ०.१०.०० |
| ४ | कोडीवते (मुळ गावठांण) | ६९/११ | ०.२०.०० | ०.०५.०० |
| ५ | मोरेवाडी (शिंगरकोंड) | ४७/२४ | ०.१०.०० | ०.०५.०० |
| ६ | वरंध (बौध्दवाडी) | २४५/८अ | ०.६७.०० | ०.०५.०० |
| ७ | पातेरेवाडी (आंबिवली बु.) | २७/१ | ०.७७.५० | ०.०५.०० |
| ८ | रायगडवाडी (हिरकणीवाडी) | ११८/२ | ०.१७.६० | ०.१०.०० |
| ९ | पुनाडे तर्फे नाते (पुनाडेवाडी) | ७१/३७ब | १.४२.०० | ०.०५.०० |
| १० | मोहोत (सुतारवाडी व भिसेवाडी) | ६१७ | ०.३०.६० | ०.०५.०० |
| ११ | वरंध (पोकळेवाडी कुंभारकोंड) | १३/१०ब | ०.७९.०० | ०.१०.०० |
| १२ | लोअर तूडील (नामावलेकोंड) | ३६/१अ | ०.१०.५० | ०.०५.०० |
| १३ | आंबेनळी (आंबेशिवथर) | ६७ | ०.०६.०० | ०.०५.०० |
| १४ | भिवघर | ५० | ०.१५.७० | ०.०३.०० |
| | | ५१ | ०.२६.०० | ०.०२.०० |
| १५. | रावतळी मानेची धार | ६६४ | १.९२.०० | ०.०५.०० |
| १६ | गोठे बु. | ३१/४ | ०.२०.६० | ०.२०.०० |

### तालुका पोलादपूर. जिल्हा रायगड

| अ.क्र. | दरडग्रस्त गावाचे नाव | स.नं. | एकूण क्षेत्र | निवारा शेडसाठी आवश्यक क्षेत्र (गूंठे) |
|---|---|---|---|---|
| १ | दाभीळ | ३/२८ | ०.०४.५० | ०.०४.५० |
| २ | केवनाळे (नानेघोळ ) | ५१४ | ०.१८.० | ०.०५.०० |
| ३ | किनेश्वर (गावठाण पेढेवाडी) | ४२/४५ | ०.६५.०० | ०.०५.०० |
| ४ | किनेश्वर (शिववाडी, पेठवाडी, किनेश्वरवाडी) | १५/१५अ | ०.४५.०० | ०.०५.०० |
| ५ | कामथे व फौजदारवाडी | ४४/३७ | ०.४१.०० | ०.०५.०० |
| ६ | कातळी कामतवाडी | ७२/४ | ०.०३.०० | ०.०३.०० |
| ७ | हळदुळे (बौध्दविहार) | ३४/२ | ०.५७.०० | ०.०५.०० |
| ८ | मोरसडे-आडाचा कोंड | ४६/६१ | ०.४०.०० | ०.०५.०० |
| ९ | कुडपण बु. | ४०/१,४०/२ | ०.१६.२० | ०.०५.०० |
| १० | साखर पेढेवाडी व चव्हाण वाडी | ६/३ | ०.१६.३० | ०.०५.०० |
| ११ | धामणदेवी | ९२/० | ०.२३.०३ | ०.०५.०० |

**ठिकाण : महाड**
**दिनांक ०९/१०/२०२५**

**सही/-**
**( पोपट ओमासे)**
**उपविभागीय अधिकारी**
**महाड उपविभाग महाड**

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/१६५/१३०४/२०२५**

# कारच्या काचा फोडून चोरी

२६ लाखांचा ऐवज चोरी, १५ लाखांची रोकड

## दोन दिवसांत तीन घटना





**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत गेल्या दोन दिवसात तीन ठिकाणी पार्किंग केलेल्या कारच्या काचा फोडून आतील ऐवज चोरी करण्याच्या तीन घटना घडल्या आहेत. यातील दोन घटना वाशी सारख्या कायम गजबजलेल्या आणि पे अँड पार्क सुविधा असणाऱ्या ठिकाणी झाल्या असून एक ऐरोली येथे झाली आहे. या घटनांच्या मुळे रस्त्यावर वाहन पार्किंग करणे धोक्याचे ठरत आहे.

सीबीडी येथे राहणारे व ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करणारे जसपालसिंग सिद्धू हे कामानिमित्त वाशी येथे आले होते. त्यांनी त्यांची कार वाशी सेक्टर १७ येथील एका ठिकाणी पार्किंग मध्ये पार्क केली होती. ते रात्री सव्वा सात वाजता एका कार्यालयात गेले व घरी जाण्यास सव्वा नऊ वाजता तेथून बाहेर पडले. ते गाडी जवळ आले असता गाडीची काच फोडलेली आढळून आली. त्यांनी तात्काळ गाडीच्या आतील काही चोरी झाले का याची तपासणी केली असता गाडीतील एक बॅग आढळून आली नाही. याच बॅगेत त्यांनी १५ लाख ७० हजार रुपयांची रोकड ठेवली होती. चोरी झाल्याची खात्री पटल्यावर त्यांनी वाशी पोलीस ठाण्यात कळवले. पोलिसांनी घटनास्थळी येत पाहणी करून गुरुवारी अपरात्री अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद केला आहे.

दुसऱ्या घटनेत वसई येथे राहणारे जतीन गोहिल हे कामानिमित्त ऐरोली येथे आले होते. आपले काम आटोपल्यावर ते सेक्टर १९ येथील पूवाज नावाच्या हॉटेल मध्ये जेवण करण्यास गेले . जेवण करून घरी जाण्यासाठी गाडी जवळ आले असता गाडीची काच फोडलेली आढळून आली तसेच आतील ७० हजार रुपयांचा लॅपटॉप, ७०० रुपयांचा चार्जर, अन्य एक ४५ हजार रुपयांचा लॅपटॉप अन्य काही किरकोळ किमतीच्या वस्तू अशा एकूण १ लाख १६ हजार ७५० रुपयांच्या बारा वस्तूंची चोरी झाल्याचे समोर आले. यात काही कागदपत्रांचा समावेश आहे. हि चोरी बुधवारी सकाळी साडे आठ ते पावणे दहाच्या दरम्यान झाली आहे. या प्रकरणी रबाळे पोलिसांनी अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद केला आहे.

तिसऱ्या घटनेत चेंबूर येथील बांधकाम व्यवसायिक अक्षय बागल हे वाशीत आले होते. त्यांनी वाशी स्टेशन परिसरातील भगवान महावीर मार्गावर आपली गाडी पार्क करून एका ठिकाणी कामानिमित्त गेले होते. परत आल्यावर त्यांच्या गाडीची काच फोडून आतील ९ लाखांची रोकड चोरी झाल्याचे उघडकीस आले. हि घटना ७ तारखेला संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटे ते सात वाजून ३६ मिनिटे दरम्यान घडली आहे.

### गर्दीच्या ठिकाणीही चोरांचे धाडस

नवी मुंबईत पार्किंग केलेल्या गाड्यांच्या काचा फोडून आतील ऐवज चोरी केल्याच्या घटना कमी झाल्या होत्या. मात्र आता पुन्हा दोन दिवसात तीन घटना घडल्याने एखादी टोळी कार्यरत झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे कायम गर्दी असलेल्या ठिकाणीही अशा घटना घडल्याने चोरट्यांचे धाडस वाढल्याचे दिसून येत आहे तर पोलिसांच्या कार्यशैलीवर प्रश्न चिन्ह उमटत आहे.

या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या यातील वाशी येथे घडलेल्या घटनेत दोन्ही ठिकाणी गाड्या या पे अँड पार्क सुविधा असणाऱ्या ठिकाणी पार्क केलेल्या होत्या. तर तिन्ही चोरीच्या घटना या गजबजलेल्या ठिकाणी झाल्याने चोरट्यांना पकडणे पोलिसांच्या समोर आव्हान उभे राहिले आहे.

# १३ ऑक्टोबरला उरण पं. स.च्या आठ गणांचा आरक्षणासाठी सोडत

## मतदार याद्यांचा कार्यक्रमही जाहीर



**उरण : प्रतिनिधी**

आगामी होऊ घातलेल्या उरण पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्यांच्या आरक्षणासाठी उरण तहसिलदारांनी विशेष सभा आयोजित केली आहे. १३ ऑक्टोबर रोजी आयोजित केलेल्या या विशेष सभेसाठी तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांचे नेते, पुढारी, कार्यकर्ते व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन उरणचे तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी केले आहे.

उरण पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका येत्या काळात होणार आहेत. या दरम्यान उरण पंचायत समितीच्या केगाव, चाणजे, नवघर, भेंडखळ, जासई, चिर्ले, चिरनेर, आवरे आदी आठ गणातील आठ जागांसाठी आरक्षण कार्यक्रम १३ आक्टोंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आला आहे. उरण पंचायत समितीच्या कार्यालयाच्या सभागृहात सोडत पध्दतीने जागांचे आरक्षण केले जाणार आहे.

१३ आक्टोंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या आयोजित केलेल्या विशेष सभेसाठी तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांचे नेते, पुढारी, कार्यकर्ते व नागरिकांनी बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन उरण तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी केले आहे.

**मतदार यादी कार्यक्रमाचे टप्पे**

तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे. निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया ८ ऑक्टोबर पासून सुरू करण्यात आली आहे. ८ ते १४ ऑक्टोबर २०२५ दरम्यान नागरिकांकडून प्रारुप मतदार यादींवर हरकती व सूचना स्विकारण्यात येणार आहेत. २७ ऑक्टोबर रोजी निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार याद्या अंतिम व अतिप्रमाणित प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

> **२७ ऑक्टोबर रोजी मतदान केंद्रांची व मतदान केंद्रनिहाय यादीही प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार याद्या https:/ raigad.gov.in या संकेत स्थळावरही उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत तसेच उरण तहसील कार्यालयातही मतदार प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. याची नोंद घेऊन काही सुचना, तक्रारी असल्यास मतदार व नागरिकांनी तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधावा.**
> **–डॉ. उध्दव कदम, तहसीलदार, उरण**

# ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत सी – १२२, से–०४, ऐरोली, नवी मुंबई येथे अनधिकृतपणे बांधकाम सुरू केले होते. अनधिकृत बांधकामास अतिक्रमण विभागाने नोटीस बजाविण्यात आली होती. तद्नंतर संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविने आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते. अनधिकृत बांधकाम सुनील काठोळे, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करून निष्कासित करण्यात आले.

धडक मोहिमेसाठी जी–विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी / कर्मचारी, मजूर ०५, ब्रेकर–२, गॅसकटर–१, तसेच अतिक्रमण विभागाचे पोलिस तैनात होते.

# चिरनेरला वन्यजीव सप्ताह

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्लिश मीडियम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र शासन वनविभाग अलिबाग वन (परी क्षेत्र) उरण व फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्ग संवर्धन संस्था चिरनेर यांच्या विद्यमाने वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला.

या वेळी फॉन संस्थेतर्फे विशेष वन्यजीव छायाचित्र प्रदर्शन व पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांना वन्यजीव संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. संस्थेचे सदस्य व वन्यजीव अभ्यासक निकेतन ठाकूर यांच्यातर्फे वन्यजीव सप्ताह निमित्त विद्यार्थ्यांना भेट देण्यात आली.

# याकुब बेग हायस्कुलला आर्थिक मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवले एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल काझी यांनी संस्थेच्या अंतर्गत चालणऱ्या याकुब बेग हायस्कुल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज पनवेल आणि बारापाडा इंगलो उर्दु हायस्कूल यांना विविध कामासाठी रक्कम रूपये १७,००,००० (सत्तरा लाख रुपयांचा) धनादेश दिला आहे.

इकबाल काझी यांनी याआधीही ३३,००,००० लाख रुपयांचा धनादेश दिला होता. काझी हे नेहमी गरीब व गरजू विदयार्थ्यांना आर्थिक मदत करतात. त्याचा हेतू असा आहे की, कोणताही विद्यार्थी पैशाच्या अभावी शिक्षणापासून वंचित न राहवे. आणि शाळेमध्ये घरासारखे वातावरण मिळावे, इकबाल काझी यांच्या कार्यामुळे त्यांच्यावर कौतुक होत आहे.

# शिरवणे गावात सुरवंटाचा त्रास

## भाजपच्या माधुरी सुतार यांच्याकडून प्रतिबंधात्मक उपाय



**नवी मुंबई : बातमीदार**

बदलत्या हवामानानुसार शिरवणे गाव नेरूळ या परिसरामध्ये काळे किडे–सुरवंट यांची उत्पत्ती होऊन या उपद्रवाचा त्रास नागरिकांना होत आहे. हे सुरवंट भीतीवर चिकटलेले आहेत. अनेकदा ते अंगावर नागरिकांच्या पडत असतात. त्यामुळे अंगाला कंद सुटते. त्वचेची आग होते. यामुळे नागरिक त्रासले आहेत. सातत्याने नागरिक स्वतः पालिकेकडे तक्रारी करत आहेत. माधुरी सुतार यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. सुतार यांनी नवी मुंबई महानगरपालिका कडे तक्रार केली असता, पालिकेकडून त्याबाबत कोणतीही उपाययोजना केली गेली नव्हती.

अखेर भाजपच्या माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी स्व खर्चाने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मोफत जंतुनाशक फवारणी परीसरात करून घेतली. त्यामुळे बऱ्याचंशी पसरलेल्या सुरवंटांचा त्रास कमी झाला. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. प्रभागात कोणतीही समस्या उद्भवली असल्यास भाजपा जनसंपर्क कार्यालयात तक्रार नोंदवा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सानपाडा परिसरात रस्त्यांना खड्ड्यांचा विळखा; नागरिक त्रस्त



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा परिसरातील प्रमुख रस्त्यांसह आतील रस्त्यांवरदेखील मोठ–मोठे खड्डे निर्माण झाल्याने नागरिकांचे हाल होत असून हे खड्डे तातडीने बुजवावेत अशी मागणी शिवसेना (शिंदे गट) नवी मुंबई उपजिल्हा प्रमुख मिलिंद सूर्यराव यांनी मनपा प्रशासनाकडे केली आहे.

गणराया पाठोपाठ देवीचे देखील विसर्जन खड्ड्यांमधून झाले. सतत पडणाऱ्या पावसामुळे खड्डे पडले आहेत. शिवाय या रस्त्यांवरून नियमित जाणारे वाहनचालक आणि पादचाऱ्यांसाठी धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे.

विशेषतः सानपाडा रेल्वे स्टेशन परिसर, पालिकेच्या विभाग कार्यालयालगत असलेल्या रस्त्यांवर तसेच सेक्टर ४, ७ आणि ८ मधील रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य दिसून येत आहे. मोठ्या खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांचे संतुलन बिघडून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. रात्रीच्या वेळी हे खड्डे न दिसल्याने अनेक छोटे–मोठे अपघात घडल्याची तक्रार स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

राजमाता अहिल्याबाई होळकर चौक, सेक्टर ८ मधील नवरत्न सोसायटी समोर, सीताराम उद्यान ते सेंव्हथ डे शाळेसमोरील रस्ता, सेक्टर ५ आणि ७ मधील रस्ता, मुंबई मराठा देशस्थ इमारती समोरील रस्ता, सानपाडा पोलीस चौकी समोरील रस्ता जवळपास सानपाडा पूर्वेकडील सर्वच रस्त्यांची दुरावस्था होऊन मोठमोठे खड्डे पडले आहे.

तर नागरिकांनी तातडीने खड्डे बुजवण्याची मागणी केली असून अपघात टाळण्यासाठी महापालिकेने युद्धपातळीवर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मिलिंद सूर्यराव यांनी केली आहे.

# पनवेलमध्ये दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिजात मराठी भाषा सप्ताह आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला आहे. या अंतर्गत गुरूवारी (दि.९) पनवेल महानगरपालिका व के.गो लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यामाने दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयामध्ये करण्यात आले. दुपारी १२ ते ६ यावेळेत झालेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन माजी कुलगुरू प्रा. वि.ल.धारूरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, लोकनेते दि.बा पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक वाल्मिकी राठोड, के.गो.लिमये वाचनालयाचे कोषाध्यक्ष प्रकाश पाटील उपस्थित होते. महापालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळ व महाविद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

या प्रदर्शनास रामशेठ ठाकूर इंग्लीश मिडीयम स्कूल कामोठे, केएलई महाविद्यालय कळंबोली, सरस्वती इंजिनिअरींग महाविद्यालय खारघर, पिल्लई महाविद्यालय, डी.डी विसपुते महाविद्यालय, पिल्लई महाविद्यालय, महापालिकेच्या सर्व शाळा, शासकीय डीएड महाविद्यालय अशा विविध शाळा व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी भेट दिली.

# अभिजात मराठी भाषा सप्ताहांतर्गत शुध्दलेखनाचे धडे




**नवी मुंबई : बातमीदार**

आपण जसे बोलतो तसे लिहिता आले पाहिजे म्हणजे इतरांना आपल्याला काय म्हणायचे आहे ते नेमकेपणाने कळेल असे सांगत लेखक, गज़लकार जनार्दन म्हात्रे यांनी विविध उदाहरणे देत उच्चारानुसार शब्दाक्षरे लिहिण्याच्या पध्दती सांगत मराठी शुद्धलेखनाचे धडे दिले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त मुख्यालयातील ज्ञानकेंद्रामध्ये आयोजित 'अभिजात मराठीतील शुद्धलेखन' या विषयावर जनार्दन म्हात्रे यांनी सादरीकरणाव्दारे उपस्थितांशी संवाद साधला. अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड यांनी व्याख्यात्यांचा परिचय करून दिला.

प्रत्येक अक्षराला स्वत:ची देहबोली असते असे स्पष्ट करीत परंपरेने आपण करीत असलेल्या भाषा लिखाणातील चुका सुधारण्यासाठी ही एक प्रकारची कार्यशाळा असल्याचे ते म्हणाले. प्रत्येक भाषेला एक व्याकरण असते. ते भाषा शिकता शिकता सहज आत्मसात होत जाते. त्यामुळे शुद्धलेखन ही वेगळी प्रक्रिया नसून भाषा शिक्षणात त्यासोबत ओघाने होणारी गोष्ट असल्याचे ते म्हणाले. २०२२ मध्ये शुद्धलेखनाची नवी नियमावली लागू झाली आणि आपल्या बाराखडीमध्ये आणि 'ऑ' हे दोन स्वर नव्याने समाविष्ट झाले अशी माहिती देत लेखनातील नुक्त्याचे महत्व जनार्दन म्हात्रे यांनी विविध उदाहरणे देत सांगितले.

शुद्धलेखनाचे महत्व सांगताना जनार्दन म्हात्रे यांनी संगणकीय फॉन्ट तसेच मराठी लेखनासाठी वापरले जाणारे किबोर्ड व सॉफ्टवेअर यांचीही सविस्तर माहिती दिली.

# 'मोनार्क सर्व्हेयर्स'ची नवी मुंबई विमानतळ प्रकल्पात ऐतिहासिक कामगिरी



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन पार पडले. या विमानतळाच्या उभारणीत भूमी अधिग्रहण प्रक्रियेत अचूक सर्वेक्षण, आरेखन आणि अभियांत्रिकी कौशल्यासाठी प्रसिद्ध असलेल्या 'मोनार्क सर्व्हेयर्स अँड इंजिनिअरिंग कन्सल्टंट्स लिमिटेड' या पायाभूत सुविधा सल्लागार कंपनीने महत्वाची भुमिका बजावली आहे.

नवी मुंबई विमानतळाच्या उभारणीसाठी उलवेसह इतर १० गावांची जमिन सरकारच्या वतीने घेण्यात आली होती. यामध्ये या १० गावांचे पुनर्वसन ही महत्वाची प्रक्रिया होती.

राज्य आणि केंद्र सरकारच्या धोरणात्मक पायाभूत सुविधा आराखड्याचा भाग म्हणून मोनार्कला विस्तृत भूमी अधिग्रहणाची जबाबदारी देण्यात आली होती. यामध्ये प्रकल्पग्रस्तांचे नकाशांकन, कायदेशीर पडताळणी, भरपाई संरचना आणि पुनर्वसन आराखडा तयार करणे या सर्व बाबींचा समावेश करण्यात आला होता. भू–माहिती सल्ला, सामाजिक परिणाम मूल्यांकन आणि वनक्षेत्र हस्तांतरणातील सखोल अनुभवामुळे या कंपनीने संपूर्ण प्रक्रिया राज्य व केंद्र शासनाच्या नियमांशी सुसंगतपणे पूर्ण केली आहे.

नवी मुंबई विमानतळ हा प्रकल्प म्हणजे राष्ट्रनिर्मितीकडे मोनार्कच्या शिस्तबद्ध, नियमाधारित आणि हितधारक–केंद्रित दृष्टिकोन याचे जिवंत उदाहरण आहे. प्रतिकूल परिस्थिती हाताळताना पारदर्शकता, प्रामाणिकता आणि सुयोग्य प्रशासन यांचा समतोल राखणे हेच मोनार्कच्या यशाचे रहस्य ठरल्याचे कंपनीचे व्यवसाय संचालक सुनील कोकरे यांनी सांगितले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा मुंबई विमानतळावरील वाहतूकदाब कमी करून मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक विकासाला नवे गतीमान रूप देणार आहे. या प्रकल्पात मोनार्कने बजावलेली भूमिका भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्रातील एक विश्वसनीय, तांत्रिकदृष्ट्या प्रगल्भ आणि जबाबदार भागीदार म्हणून संस्थेची ओळख अधिक दृढ करणारी ठरली असल्याचे बोलले जात आहे.

# ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त कार्यक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

ज्येष्ठांकडे ज्ञानाचे भांडार असते ते त्यांनी समाजाच्या हितासाठी वापरावे अशी अपेक्षा व्यक्त करीत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नवी मुंबई महानगरपालिका ज्येष्ठांना भावनिक आधार देण्याचे काम करते अशा हृद्य शब्दात ज्येष्ठ नागरिक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात ज्येष्ठ नागरिक दिनाच्या निमित्ताने आयोजित विशेष समारंभात ते बोलत होते. या वेळी नवी मुंबई पालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

बेलापूर येथील ज्येष्ठ नागरिक संघटनेने सादर केलेल्या स्वच्छता विषयावरील जनजागृतीपर लघुनाटिकेचा आधार घेत आयुक्तांनी नवी मुंबई शहराच्या स्वच्छतेमधील मानांकनात लहानथोर सर्वच घटकांचा महत्वाचा वाटा असल्याचे सांगत मानवी जीवनाला व निसर्गाला घातक असणाऱ्या प्लास्टिकला नकार देण्याचे निश्चित ठरविले पाहिजे असे सांगितले. ज्येष्ठांकरीता मानसिक स्वास्थ्यही तितकेच महत्वाचे असून त्यादृष्टीने ज्येष्ठांनी काळजी घ्यावी, असेही ते म्हणाले.

# भूमी अभिलेख कार्यालय झाडेझुडपांच्या विळख्यात; सापांचे दर्शन, नागरिक भयभीत

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय (रायगड) हे तालुक्यातील एक अत्यंत महत्त्वाचे शासकीय कार्यालय मानले जाते. दररोज शेकडो नागरिक जमीन नोंदणी, नकाशे, सर्वेक्षण, हद्ददाखले आणि मालकीविषयक कामांसाठी या ठिकाणी ये-जा करतात. मात्र, या कार्यालयाचे सध्याचे स्वरूप पाहून नागरिक भयभीत झाले आहेत , कारण कार्यालय आज अक्षरशः झाडे, वेली, झुडपे आणि गवताच्या जाळ्यात गुरफटलेले आहे.



गेल्या काही महिन्यांत या परिसरात दोन ते तीन वेळा साप आणि इतर विषारी सरपटणारे प्राणी आढळून आले आहेत. काहीवेळा हे साप थेट कार्यालयाच्या आतील परिसरात घुसले, तर काही वेळा बाहेरील गवतात नागरिकांच्या नजरेस पडले. यामुळे ये-जा करणारे नागरिक आणि तेथे कार्यरत कर्मचारी दोघेही सतत भीतीच्या छायेत काम करत आहेत. कधी कोणाला साप चावेल आणि जीव धोक्यात येईल सांगता येत नाही, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

भूमि अभिलेख विभाग हा नागरिकांच्या जमिनीशी, मालमत्तेशी आणि मालकीहक्काशी निगडीत अत्यंत संवेदनशील विभाग आहे. अशा महत्त्वाच्या कार्यालयाचे वातावरण जर अस्वच्छ, असुरक्षित आणि जंगलासारखे झाले असेल, तर शासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उभे राहते, अशी टीका नागरिक करत आहेत. अनेकांनी सांगितले की, या ठिकाणी येताना आम्हाला कार्यालयात काम करण्यापेक्षा सापाच्या भीतीतून पार पडणे कठीण जाते.

स्थानिकांनी पंचायत समिती श्रीवर्धन नगरपरिषद व महसूल विभागाकडे या ठिकाणी तत्काळ स्वच्छता मोहीम राबवून परिसरातील झाडे-झुडपे हटवावीत, नियमित फवारणी करावी आणि सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. हे कार्यालय नागरिकसेवेचे केंद्र असताना आज नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने आता तरी जागे व्हावे, असे आवाहन नागरिकांनी केले आहे.

शासकीय कार्यालये ही लोकांचा विश्वास जपणारी ठिकाणे असावीत; मात्र श्रीवर्धनमधील भूमि अभिलेख कार्यालयातील परिस्थिती या विश्वासाला धक्का देणारी आहे. जिल्हा प्रशासनाने या बाबीची तात्काळ दखल घेऊन कार्यालय 'श्वासमुक्त' करावे, अन्यथा कोणतीही अपघातजन्य घटना घडल्यास जबाबदारी प्रशासनाचीच ठरेल, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

# 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे गावच्या सर्वांगीण विकासासाठी माध्यम'

**चौक: प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रोत्साहन देणारे आणि गावांच्या सर्वांगीण विकासासाठी एक सुवर्ण संधी आहे, त्यामुळे प्रत्यक ग्राम पंचायत यांनी मनापासून आणि प्रामाणिक काम करावे असे आवाहन रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे.खालापूर तालुक्यातील ४५ ग्राम पंचायत यांचा मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान आढावा बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली खालापूर पंचायत समितीच्या सभागृहात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

१७ सप्टेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यास सुरुवात झाली आहे.या अभियानांतर्गत सुशासन, सक्षम पंचायत, जलसमृद्धी, स्वच्छता, आणि हरित विकास यांसारख्या सात मुख्य घटकांवर लक्ष केंद्रित केले जात असून ज्यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था अधिक कार्यक्षम आणि सक्षम बनविण्याचा प्रमुख उद्देश या अभियानाचा आहे. तालुका,जिल्हा ते राज्य स्तरावर ग्रामपंचायतींना त्यांच्या कामांमध्ये प्रोत्साहन देण्यासाठी आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी हे अभियान सुरू करण्यात आले आहे. सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित पंचायत यांसारख्या पैलूंवर भर दिला जाणार आहे.

आपल्या अध्यक्षयी भाषणात त्या पुढे म्हणाल्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांची कार्यक्षमता वाढवून गावांचा शाश्वत विकास साधणे हे सहज शक्य होणार आहे, त्यामुळे प्रत्यकाने झोकून काम करा, असे आवाहन केले. खालापूर तालुक्यातील प्रत्यक ग्राम पंचायत सक्षम झाली असून प्रत्यक अभियानात सहभागी होतात, माझी वसुंधरा अभियान, मुख्यमंत्री माझी शाळा यात राज्यस्थरावर पारितोषिक मिळवले असून अनेक ग्राम पंचायत यांनी नावीन्य पूर्ण उपक्रम सुरू केले असून स्थानिक स्तरावर त्यांना पाठींबा मिळत असल्याचे आपल्या प्रास्ताविकात गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी सांगितले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) तनपुरे यांनीही मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान बाबत मार्गदर्शन केले.प्रकल्प संचालक उछऊ- प्रियदर्शनी मोरे यांनी आढावा घेतला.


## नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH46AK8262 चे मालक **रमेश पांडूरंग मराठे** यांचे तारीख २२/७/२०२५ रोजी निधन झालेले आहे.

मी सुमती रमेश मराठे, ३४ अ श्रमसाफल कॉलनी देवपूर, गोंदूर रोड धुळे- महाराष्ट्र ४२४००२ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.


या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निर्दशनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - सुमती रमेश मराठे**
**पत्ता- ३४ अ श्रमसाफल कॉलनी देवपूर, गोंदूर रोड धुळे- महाराष्ट्र ४२४००२**


# बोरघर येथे रानडुकरांचा त्रास प्रशासनाने दखल घेण्याची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील बोरघर परिसरात रानडुकरांचा प्रचंड हैदोस सुरू असून, या भागातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. हातात तोंडाशी आलेले भात पिक , कारले, भेंडीसह विविध पिकांची संपूर्ण नासधूस झाली असून, शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. गावातील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तात्काळ पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, तसेच रानडुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, गेल्या काही महिन्यांपासून रानडुकरांचा उपद्रव प्रचंड वाढला असून, रात्रीच्या वेळी ते शेतात घुसून पिकांची हानी करत आहेत. शेती करणेच अवघड बनले आहे.



या घटनेबाबत यशवंत सहदेव भगत यांच्या शेतात नुकतेच रानडुकरांनी हाहाकार माजवून सुमारे ८० ते ८५ टक्के भात पिकाचे नुकसान केले आहे. श्री. भगत यांनी सांगितले की, महिन्यांच्या मेहनतीने लावलेली शेती एका रात्रीत संपली. आता हंगाम संपल्याने पुन्हा पीक लावणे शक्य नाही. प्रशासनाने तातडीने मदत द्यावी.

गावातील इतर शेतकऱ्यांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, सुमारे ८० ते ९० टक्के शेतकऱ्यांची पिके पूर्णतः नष्ट झाली आहेत. एकूण १०० हेक्टरपेक्षा अधिक भात शेती उद्धवस्त झाल्याची माहिती मिळाली आहे. या संदर्भात तालुक्याचे वनविभागाचे मुख्य अधिकारी दबडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीबाबत अर्ज करावा. त्यासोबत आधार कार्ड, सातबारा उतारा, बँक पासबुक या कागदपत्रांच्या प्रती जोडून द्याव्यात. प्राप्त अर्जांच्या आधारे प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करून अहवाल वरिष्ठांना सादर केला जाईल अशी माहिती दिली .

दरम्यान, बोरघर व परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी प्रशासन व वनविभागाने संयुक्त सर्वेक्षण करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी, तसेच रानडुकरांच्या नियंत्रणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. आमच्या मेहनतीचा घास हिरावला गेला आहे; आता प्रशासनाने तरी न्याय द्यावा अशी बोरघर येथील सर्व शेतकऱ्यांची मागणी आहे.

# मुरूड तालुक्यातील अधिकृत वेबसाईट तयार करणारी साळाव पहिली ग्रामपंचायत

**रेवदंडा : प्रतिनिधी**

साळाव ग्रामपंचायतीच्या अधिकृत संकेतस्थळाचे उद्घाटन मुरुड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी खताळ, यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. कार्यक्रमासाठी सरपंच वैभव कांबळी, उपसरपंच दिनेश बापलेकर, ग्रामसेवक आशा बिरवाडकर यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



स्मार्ट ग्राम पुरस्कारासाठी आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानामध्ये सक्रिय सहभागामुळे, साळाव ग्रामपंचायत सध्या तालुक्यात चर्चेत आहे. या दोन्ही महत्त्वपूर्ण योजनांच्या पूर्ततेसाठी ग्रामपंचायतीत अनेक अभिनव उपक्रम राबवले जात आहेत. याच प्रयत्नांचा भाग म्हणून, तालुक्यातील साळाव ग्रामपंचायतीने डिजिटल युगात एक अभिनव पाऊल टाकले असून, ही ग्रामपंचायत मुरुड तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये स्वतःची अधिकृत वेबसाईट तयार करणारी पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

यावेळी बोलताना गट विकास अधिकारी खताळ यांनी या डिजिटल उपक्रमाचे विशेष कौतुक केले. मुरुड तालुक्यासाठी हा एक मैलाचा दगड आहे. स्मार्ट ग्राम व समृद्ध पंचायत अभियानांतर्गत अशा डिजिटल सुविधा अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. या संकेतस्थळामुळे ग्रामस्थांना शासनाच्या विविध योजना, आवश्यक दाखले आणि ग्रामपंचायतीच्या कामांची माहिती तत्काळ उपलब्ध होईल.

या संकेतस्थळामुळे ग्रामपंचायतीची संपूर्ण माहिती, महत्त्वाच्या सूचना, विकासकामांचा अहवाल, आवश्यक कागदपत्रे आणि पदाधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे संपर्क तपशील उपलब्ध आहेत.


## नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH46Z8509 चे मालक **रमेश पांडूरंग मराठे** यांचे तारीख २२/७/२०२५ रोजी निधन झालेले आहे.

मी सुमती रमेश मराठे, ३४ अ श्रमसाफल कॉलनी देवपूर ,गोंदूर रोड धुळे- महाराष्ट्र ४२४००२ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निर्दशनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - सुमती रमेश मराठे**
**पत्ता- ३४ अ श्रमसाफल कॉलनी देवपूर, गोंदूर रोड धुळे- महाराष्ट्र ४२४००२**


# दिव्यांगांना साहित्य वाटप

**खोपोली :** येथील शालोम एज्युकेशन सेंटर संचालित सोफिया दिव्यांग मुलांच्या शाळेमध्ये सामाजिक कार्यकर्ते धनंजय मराठे व प्राची मराठे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक पॅड आणि बिस्कीट पुड्यांचे वाटप केले. याप्रसंगी सेवाभारतीचे जिल्हा सचिव नितीन भावे, मुख्याध्यापिका शुभलक्ष्मी पाटणकर, विषय शिक्षिका साक्षी पवार, शिक्षिका मंजू बोडके , क्राफ्ट टीचर जयंती सोलंकी, शिपाई जयकुमार म्हात्रे ,दुर्गा दाभाडे, रुचिता सावंत याप्रसंगी उपस्थित होते. दिव्यांग मुलांनी बनवलेल्या पणत्या, आकाश कंदील, उटणे, साबण व अन्य वस्तूंचे प्रदर्शन लवकरच भरवण्यात येणार असल्याची माहिती मुख्याध्यापिका पाटणकर यांनी दिली.


## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-खानाव, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**- मिळकतीचे वर्णण-**
**मौजेः खानाव, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| खानाव | १.प्रमोद राजाराम म्हात्रे<br>२. दत्तात्रेय गणु तोडेकर | ४८/१ | ०.४४.५०<br>०.०३.३०<br>०.४७.८० | ७.७५ |
| | प्रमोद राजाराम म्हात्रे | ४८/२/अ | ०.४९.००<br>०.०३.५०<br>०.५२.५० | ६.८१ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक: ०९/१०/२०२५**

**सही/-**
**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**
**पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को.ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६**
**मो. क्र.९६९९४९९९६३**



## ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली
## लोधिवली, ता.खालापूर, जि. रायगड
## विकास कामे जाहिरात

ग्रामपंचायत लोधिवली हद्दीतील ग्रामनिधी अंतर्गत सन २०२५-२६ या वर्षाच्या करिता खालील प्रमाणे विकासकामे करावयाची आहे. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.१०/१०/२०२५ ते दि.१६/१०/२०२५ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. १७/१०/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील किंवा ग्रामपंचायत ठरवेल त्या दिवशी उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत लोधिवली यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे/रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव व योजना नाव | निधी | अ. रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वरोसे बौद्धवाडी संतोष निकाळजे ते सुनिल मोरे यांचे घरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | ग्रामनिधी १५% मा.खर्च सन २०२५-२६ | २०००००० | ५०० | १% | ६ म. |
| २ | वरोसे बुध्दविहाराची डागडुजी व रंगरंगोटी करणे. | ग्रामनिधी १५% मा.खर्च सन २०२५-२६ | १५०००० | ५०० | १% | ६ म. |
| ३ | मौजे लोधिवली गाव व लोधिवलीवाडी येथील रस्त्यावरील खड्डे भरणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | ३५००० | २०० | १% | ६ म. |
| ४ | मौजे लोधिवली अंगणवाडी बाजूचा गटार दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | १५०००० | ५०० | १% | ६ म. |
| ५ | लोधिवली साधुराम पाठारे यांचे घर ते धनाजी भुईकोट यांच्या घरापर्यंत विद्युत अंडर ग्राऊंड लाईन टाकणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | २००००० | ५०० | १% | ६ म. |
| ६ | नढाळ येथील समीर दळवी यांचे घर ते कुचेकर यांचे घरापर्यंत गटारावर ५ चेंबर टाकणे. | ग्रामनिधी सन २०२५-२६ | ७०००० | २०० | १% | ६ म. |

**टीप:-**
१) निविदा भरणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी दि.१०/१०/२०२५ ते दि.१६/१०/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय लोधिवली येथे सिलवंद लिफाफा जमा करणे बंधनकारक आहे.
२) निविदा भरताना आपले दर जी.एस.टी. वगळून भरणे बंधनकारक आहे. जी.एस.टी. चे दर संबंधित विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.
३) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४) मुदतीनंतर आलेल्या खाडाखोड करून साक्षांकित न केलेल्या व अटीशर्तीयुक्त निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
५) सदर कामांच्या निविदा अंदाजपत्रक निविदा व अटी शर्ती बाबत कार्यालयात निविदा धारकास माहितीपत्रक देण्यात येईल.
६) कोणत्याही नामंजूर निविदासंदर्भात निविदा धारकास कोणत्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.
७) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराला ५०० रु च्या बॉड पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
८) निविदे सोवत १% इसारा रक्कम रोखीने ग्रामपंचायत मध्ये सामान्य पावतीने भरणा करावी
९) काम सुरु करण्यापूर्वीचे फोटो, काम सुरु असतानाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
१०) ठेकेदार ग्रामपंचायतीचा येणे बाकीदार असल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

**सही/-**
**ग्रामपंचयात अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचयात लोधिवली**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**



## जाहीर नोटीस

प्रो. जमा. ५०

अर्जदाराचे वकील
ॲड समिर राम कुंभार
मो. नं. ९००४४०२३३०

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व स्तर/क. स्तर) यांचे कोर्टात.**

दिवाणी चौकशी अर्ज १३५६/२०२५
ने.ता.१५/११/२०२५
नि.७/ड

**कै. अरूण केशव मानकामे चे वारस**
१) श्रीमती. स्मिता अरूण मानकामे
वय ७३ वर्षे, धंदा- गृहिणी
२) श्री. ओंकार अरूण मानकामे
वय ४६ वर्षे, धंदा- नोकरी
दोघेही राहणार- बी/३०३, नकुल को. ऑप हौसिंग सोसायटी, एन.एल. कॉम्प्लेक्स, ऑफ लिंक रोड, एन.एल. गार्डन समोर, आनंद नगर, दहीसर पूर्व, मुंबई ४०००६८
३) सौ. राधिका भरत गडकर
वय ४५ वर्षे, धंदा गृहिणी
राहणार- बी १०२, एंजल विला, मंडपेश्वर रोड, भगवती हॉस्पिटल जवळ, मॅडोना कॉलनी, मुंबई ४००१०३
— अर्जदार

विरूद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै. अरूण केशव मानकामे, या दिनांक १५/०५/२०१७रोजी मौजे. स्टलिंग हॉस्पिटल, ग्रेटर मुंबई, जी. आर मुंबई. येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांची आई कै. गोपीका केशव मानकामे, या मौजे. चिंध्रण, पो. देविचापाडा, ता. पनवेल, जि. रायगड. येथे बऱ्याच वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत. कै. अरूण केशव मानकामे, यांचे नावे खालील वर्णनाच्या सामाईक मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - चिंध्रण, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | हिस्सा न | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार |
|---|---|---|---|---|
| चिंध्रण | १ | १०/. | ०-०७-३० | १.५० |
| | २ | ५/. | ०-०३-८० | ०.७० |
| | ४४ | १ | ०-०५-०० | ०.१४ |
| | ४८ | ५ | ०-०६-०० | ०.१६ |
| | ६५ | ४/ब | ०-१५-०० | ३.०० |
| | ६८ | ६ | ०-३४-०० | ७.१२ |
| | ९४ | ३ | ०-२५-०० | ५.३१ |

कै. अरूण केशव मानकामे, यांस अर्जदार हे कायेदीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

तारीख ०९/१०/२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी दिली.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक ०९/१०/२०२५**

कोर्टाचा शिक्का

**हुकूमांवरुन**
**सही/-**
**सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**क.स्तर पनवेल**

## ऑस्ट्रेलियाचा धुव्वा उडवून

# भारताने कसोटीत रचला इतिहास

### फक्त ८८६ चेंडूत टेस्ट मॅच संपवली

**ऑस्ट्रेलिया : वृत्तसंस्था**

आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारताच्या १९ वर्षांखालील संघाने ऑस्ट्रेलियाला त्यांच्याच भूमीवर युवा कसोटी मालिकेत २-० असे क्लीन स्वीप देत इतिहास रचला आहे. या विजयाला खास बनवणारी गोष्ट म्हणजे मालिकेतील दुसरी कसोटी! ही कसोटी फक्त ८८६ चेंडू (सुमारे दोन दिवस) चालली आणि भारताने ती जिंकून ३० वर्षांपूर्वीचा जागतिक विक्रम मोडीत काढला.



भारताच्या युवा गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर ऑस्ट्रेलियन फलंदाज पूर्णपणे हतबल झाले. टीम इंडियाने दुसरी युवा कसोटी अवघ्या दोन दिवसांत ७ विकेट्सने जिंकून एक नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. दरम्यान, १९९५ मध्ये वेस्ट इंडिजने पाकिस्तानला फैसलाबादमध्ये ९९२ चेंडूत पराभूत केले होते. भारताने आता हा सामना केवळ ८८६ चेंडूत जिंकून सर्वात कमी चेंडूत युवा कसोटी सामना जिंकण्याचा मान मिळवला आहे.

**वैभव सूर्यवंशीची दमदार कामगिरी**

या ऐतिहासिक विजयात युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीची कामगिरी महत्त्वपूर्ण ठरली. त्याने संपूर्ण मालिकेत उत्कृष्ट फॉर्म दाखवला. वैभवची फलंदाजी, कर्णधार आयुष म्हात्रेची प्रभावी रणनीती आणि गोलंदाजांचा धारदार मारा यामुळे ऑस्ट्रेलियन संघाला मालिकेत कुठेही पुनरागमन करण्याची संधी मिळाली नाही

**भारताचे'डबल क्लीन स्वीप'**

भारताच्या १९ वर्षांखालील संघाने या दौऱ्यात ऑस्ट्रेलियन संघावर कसोटीसह एकदिवसीय क्रिकेटमध्येही आपले वर्चस्व सिद्ध केले. युवा एकदिवसीय मालिका ३-० ने जिंकली. विशेष म्हणजे, भारताने भारताने तीनही सामने मोठ्या फरकाने जिंकले. त्यानंतर युवा कसोटी मालिकेतही ऑस्ट्रेलियाचा २-० ने धुव्वा उडवला.

## सुधागड विद्यासंकुलच्या दोन विद्यार्थ्यांना कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

मुंबई विभागीय कुस्ती स्पर्धेत सुधागड विद्यासंकुल कळंबोलीच्या दोन विद्यार्थ्यांनी सुवर्णपदकाची कमाई केली. त्यामुळे त्यांची राज्यस्तरीय स्पधसाठी निवड झाली आहे.

पोलीस मुख्यालय कळंबोली येथे मुंबई विभागीय स्तरावरील कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुधागड विद्यासंकुल कळंबोलीचा विद्यार्थी संस्कार शिंदे (अकरावी सायन्स) आणि स्वप्नील लावंड (इयत्ता आठवी) या दोन्ही विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक पटकाविले. ते आता राज्यस्तरीय स्पर्धेत प्रतिनिधीत्व करतील.



या यशाबद्दल प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी संस्कार व स्वप्नीलचे अभिनंदन केले व पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख संजय पाटील, माध्यमिक विभागातील माजी उपमुख्याध्यापिका अनिता पाटील, पर्यवेक्षिका पूनम कांबळे, भगवान खेडकर, लक्ष्मण मगरेपाटील, रमेश आहेर, क्रीडा मार्गदर्शक विलास पाटील, विकास नाईक, रणधीर पाटील, पियुष सदावर्ते, यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

## शालेय जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत पनवेल, पेण सुधागडची बाजी

**पाली : प्रतिनिधी**

क्रीडा व संयुक्त सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद रायगड द्वारा रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील जिल्हा क्रीडा संकुल नेहुली अलिबाग येथे ७ ते ८ ऑक्टोबर रोजी संपन्न झाली.

या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत मुले १४ वर्ष वयोगट पनवेल,१७ वर्ष रानपाखर पेण आणि १९ वर्ष वयोगट सुधागड ग. बा वडेर हायस्कूल व व. ग. ओसवाल ज्युनिअर कॉलेज पाली या सर्व विजयी संघाने स्पर्धेत प्रथम क्रमांकाच्या पारितोषकाची कमाई केली.

शालेय जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेत १९ वर्षीय मुले सुधागड ग.बा.वडेर हायस्कूल व.व.ग.ओसवाल ज्युनियर संघाने प्रशिक्षक राकेश बेलोसे यांच्या मार्गदर्शनाखाली बहारदार खेळ करत कर्जत, रोहा, अलिबाग,पेण या संघाना एकतर्फी धूळ चारत प्रथम क्रमांक पटकावला त्याबद्दलसंस्थेच्या, महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



## जिल्हास्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेतून खेळाडूंची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धा ८ ऑक्टोबर २०२५ रोजी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेतून पनवेल महानगरपालिका हद्दीतील अनेक प्रतिभावान खेळाडूंची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धेत आगरी शिक्षण संस्था, न्यू होरिझन पब्लिक स्कूल, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, विश्वजोत हाय स्कूल, सेंट जोसेफ स्कूल, सेंट जोसेफ इंटरनॅशनल स्कूल, मायनॉरिटी इंग्लिश मीडियम स्कूल, डिव ड्रॉप्स स्कूल, के.ई.एस. इंग्लिश मीडियम स्कूल, महात्मा इंटरनॅशनल स्कूल व एस.एन.डी.टी. स्कूल या शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



१४ वर्षाखालील गटात मुलांमधून श्लोक साळुंखे (न्यू होरिझन पब्लिक स्कूल), श्रीहरी मेनोन (सेंट जोसेफ CBSE), स्वराज श्रीमंडिलकर (सेंट जोसेफ हाय स्कूल), निर्मल द्विवेदी (महत्मा इंटरनॅशनल स्कूल) यांनी तर मुलींमधून इरा आयांथ (विश्वजोत हाय स्कूल), तन्वी सरस, लावण्या भट, विनवी रावेत (रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल) व आयेशा खान (मायनॉरिटी स्कूल) यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

१७ वर्षाखालील गटात मुलांमध्ये प्रकाश गौतम (महत्मा इंटरनॅशनल स्कूल), करण कचरे (आगरी शिक्षण संस्था), आशिष गोड, सार्थक साळवी (सेंट जोसेफ स्कूल) तर मुलींमध्ये दिव्या मोकल (के.ई.एस. स्कूल), साक्षी बोने (आगरी शिक्षण संस्था), तन्वी माने, सई जगदाळे (डिव ड्रॉप्स स्कूल) आणि काव्या कुमार (रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल) यांनी विभागीय निवड मिळवली.

१९ वर्षाखालील गटात मुलांमध्ये राज पिंगळे, आदित्य भाबड (सी. के.टी. कॉलेज) आणि कौस्तुभ द्विवेदी (पिल्लई ग्लोबल स्कूल) तर मुलींमध्ये आर्या लिंगणवाड (हार्मोनी पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज, खारघर) यांनी आपले कौशल्य सिद्ध केले.

स्पर्धेचे तांत्रिक मार्गदर्शन प्रतिक्षा शेरकर (राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस खेळाडू) यांनी केले. स्पर्धेत पंच म्हणून विशाल खुटवड, शैलेश पाटील, काजल मंडल, हर्षद चंदनशिवे व मयूर निघोट यांनी कार्यभार सांभाळला.

सर्व विजेत्या व निवड झालेल्या खेळाडूंना रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, पनवेल महानगरपालिका क्रीडा अधिकारी हरेश जाधव, रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशनच्या अध्यक्षा व माजी उपमहापौर सीता पाटील, कार्याध्यक्ष पंकज भगत, सचिव स्वप्निल वारंगे व क्रीडा समन्वयक समीर रेवाळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सीकेटी कॉलेजमध्ये आंतर महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधीलचांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा बुधवार दिनांक ८ ते १६ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे.




या आंतर-महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य व मुंबई शहर झोन-१चे उपाध्यक्ष प्रो. डॉ. एस.के.पाटील यांनी केले आहे. त्याचबरोबर मुंबई शहर झोन-१ डॉ.मनोज वर्मा , मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सचिव डॉ. व्ही. बी. नाईक व मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सह-सचिव पूनम मुजावर यांची उपस्थिती लाभली.

स्पर्धेमध्ये ५१ महाविद्यालयातील मुलांच्या संघांनी सहभाग नोंदविला आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नात्ती, प्रा. भरत जितेकर व प्रा. प्रतिज्ञा पाटील, जिमखाना विभागाचे सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेत आहेत.



## इस्माईल दळवीची विभागीय कॅरम स्पर्धेसाठी निवड

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धा माणगाव येथील द.ग. तटकरे कॉलेज या ठिकाणी नुकतीच झाली. या स्पर्धेतील कॅरम खेळाच्या अंतिम सामन्यात श्रीमती गीता द. तटकरे कॉलेज वरसगावचा खेळाडू इस्माईल निसार दळवी याचा निसटता पराभव झाला, परंतु त्याने लढत दिली. त्याची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे.



स्पर्धेत जिल्ह्यातील ६४ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेसाठी श्रीमती गीता द. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वरसगावमधील खेळाडूंना गोविंद कौलगे व शिवाजी मेंडे यांचे मार्गदर्शन लाभले. आता विभागीय स्पर्धा ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजमध्ये होणार आहे.

या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त संदीप तटकरे, सचिव प्रकाश सर्कले, प्राचार्य संतोषकुमार भालेराव, प्रणय इंगळे, अमोल पवार, जयकुमार गायकवाड, निधी जाधव, वैदही जगदाळे, दिपाली सोनमळे, अजित देशमुख, राम पोळेकर, अर्चना साटम, रमेश महाले, विदुला करंबे, वैभव ठाकूर, सुशील कुचेकर यांनी इस्माईल दळवीचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## 'सीकेटी'च्या गणेश फुलारीची राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि मुंबई उपनगर क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एम.ए. स्कूल अंधेरी येथे झालेल्या मुलांच्या विभागीय तायक्वांदो स्पर्धेत सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयातील गणेश नितेश फुलारी (बारावी सायन्स) याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थ्याची छत्रपती संभाजीनगर विभागीय क्रीडासंकुल गारखेडा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तायक्वांदो स्पर्धेतील गणेशने केलेल्या चमकदार कामगिरीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बुधवारी (दि.८) मुंबई विद्यापीठांतर्गत शहापूर येथे घेण्यात आलेल्या आंतर विद्यापीठीय कुस्ती स्पर्धेमध्ये उत्तम कामगिरी करत मोठं यश संपादन केलं आहे.





या स्पर्धेची पुढील प्रमाणे विजेते आहेत: अक्षय दिघवाघ - सुवर्ण पदक विजेता आणि ऑल इंडिया कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे, भावना सिंग (द्वितीय वर्ष बी.कॉम.) कांस्य पदक, सानिया शेख (द्वितीय वर्ष बी.कॉम.) - कांस्य पदक. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचे मार्गदर्शन व सातत्यपूर्ण पाठबळ विद्यार्थ्यांना यश मिळवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले तसेच त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील कुस्ती स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे जिमखाना प्रमुख श्री. अजिंक्य भगत व रवींद्र शेळके यांनी या कुस्ती स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचा सराव करून घेतला व मार्गदर्शन केले.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com